# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

**दिनांक १९.१०.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक १९ ऑक्टोंबर २००५ रोजी मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तनवाणी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह'' येथे दुपारी १२.१० वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.काशिनाथ कोकाटे
०३. स.स.श्री.संजय शिरसाट
०४. स.स.श्री.तरविंदरसिंग धिल्लन
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१३. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१४. स.स.श्रीमती पाटील अलका रमेश
१५. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१६. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१७. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२०. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२१. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगलाल
२२. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२३. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२४. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२५. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२६. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२७. स.स.सौ.खान अजरा जबीन मसूद
२८. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२९. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
३०. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३१. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३२. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्यीन

३३. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३४. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३५. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३६. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३७. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३८. स.स.श्री.खान मुजीब मीर आलमखान
३९. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४०. स.स.सौ.खान आबेदा बेगम गुलाब खान
४१. स.स.सौ.राऊत छाया विलास
४२. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४३. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४४. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४५. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४६. स.स.श्री.अमोदी अबुबकर बीन सईद
४७. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४८. स.स.श्री.मोतीवाला अशरफ म.युनुस
४९. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
५०. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५१. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५२. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५३. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५४. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५५. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५६. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५७. स.स.सौ.महाजन मनिषा अमर
५८. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५९. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
६०. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
६१. स.स.श्री.खुडे विजय किसन
६२. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
६३. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६४. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६५. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६६. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६७. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६८. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६९. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
७०. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७१. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७२. स.स.श्रीमती वाघमारे पार्वताबाई विजय
७३. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
७४. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर

७५. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७६. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७७. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७८. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७९. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
८०. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
८१. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
८२. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८३. स.स.सौ.जैन अल्पा विकास
८४. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८५. स.स.श्री.जहागिरदार अजीज मुख्तार
८६. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
०२. स.स.श्री.राजेश व्यास
०३. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०४. स.स.श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**संवाद :**

श्री.कैलास गायकवाड :स.सदस्या श्रीमती मीराबाई शिंदे यांचे वडील स्व.सांडूजी बनकर यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे. त्यांना या सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.अ.रशिद खान :काश्मीरमध्ये भूकंपात जे लोक मृत्यू पावले त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : ठिक आहे सर्वानी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

याच वेळी काश्मिर येथे भुकंपात जे लोक मृत्यू पावले त्यांना तसेच स्व. सांडूजी बनकर यांचे दु:खद निधन झाल्याबध्दल सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

मा.महापौर : चर्चेसाठी एक तासाचा वेळ देण्यात येतो.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : चर्चेसाठी नंतर वेळ देण्यात यावा अगोदर विषय पत्रिका घेण्यात यावी.

मा.महापौर :चर्चेला सुरूवात करावी.

श्री.संजय जोशी :सध्या वृत्त्पत्रात गारखेडा भूखंड प्रकरणा संबधी बातम्या येत आहे. त्यामूळे महानगरपालिकेची प्रतिमा मलीन झालेली असून या संबधी मा.आयुक्तांनी खुलासा करावा जेणे करून आम्हा सर्व सदस्यांना माहीती होईल. तो प्रकार कसा घडलेला आहे. त्यावर मा.आयुक्तांची सही आहे. किती आयुक्तांच्या त्या संचिकेवर सहया आहेत .या संबधीची सत्य परीस्थिती ही जनतेपर्यंत गेली पाहिजे त्या संबधीचा खुलासा मा.आयुक्तांनी करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:या संबधी स्थायी समितीमधे चर्चा होवून समिती नियुक्त केलेली आहे. अहवाल देणार आहे. चर्चा करणे सयुंक्तीक होणार नाही.ठराव आणून निर्णय घ्यावा. कोणत्याही सभागृहाचा अपमान होणार नाही.

मा.महापौर :सत्य परिस्थिती कशा प्रकारे घडलेली आहे .सर्व सदस्यांना माहिती होण्यासाठी मा.आयुक्तांनी खुलासा करावा.वर्तमान पत्राबाबत स.स.श्री संजय जोशी यांनी विचारणा केल्या प्रमाणे मा.आयुक्तांनी सुरूवातीपासून सविस्तर माहिती दयावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:एखादया विषयावर चर्चा होऊन निर्णय घ्यायचा नसेल तर चर्चा करून अर्थ नाही. सदर प्रकरणाच्या बाबतीत या सभागृहात चर्चा करू नये असे माझे मत आहे.

मा.आयुक्त :गारखेडा येथील सर्वे नंबर ५३-२-२ व ५३-२-१ याशी निगडीत आहे. या क्षेत्रामधे दोन डी.पी रोड आहेत त्या डी.पी रोड चा मोबदला देण्या बध्दलचे प्रकरण होते. सन २००१ मध्ये सर्व प्रथम इमारत बांधकाम परवानगीसाठी संचिका सादर झालेली होती.त्यावेळी इमारत परवानगी देण्यात आली असून त्यावेळी या दोन्ही रस्त्याचे एफएसआय देंण्यात आलेले आहे. त्यानंतर सन २००३ मधे रिवाईज लेआऊटची परवानगी मागविण्यात आली व ती देण्यात आलेली आहे त्या रस्त्याचा मोबदला एफएसआय च्या रूपाने घेतल्यानंतर सुध्दा सन २००४ मधे या रस्त्यामधे जी जागा येत आहे त्याचा मोबदला देण्याची मागणी करण्यात आली त्याप्रमाणे संचिका चालू झाली . ज्या लोकांनीमागणी केलेली होती त्यांनी पूर्वीचा कोणताही संदर्भ दिलेला नव्हता व एफएसआयच्या रूपाने मोबदला घेतलेला आहे याची माहिती सादर केलेली नाही. मागिल महिण्यात ही संचिका माझ्याकडे आली. जेंव्हा खाजगी तडजोडीने मोबदला दयायचा तेंव्हा जाहीर प्रगटन दिले पाहिजे ज्यांची तक्रार असेल ते पूढे येवू शकतात.त्यामूळे त्या संचिकेमधे मी शेरा दिला की कोणतीही खाजगी वाटाखाटी करण्यापूर्वी वृत्तपत्रात जाहीर नोटीस देणे गरजेचे आहे. जेंव्हा जागा भूसंपादन कायद्याखाली संपादन करतो तेंव्हा दोन वेळेस नोटीफिकेशन निघते.जाहीर प्रगटन दिल्यानंतर या प्रकरणा बाबत कोणाचेही हरकती आलेल्या नाहीत.त्यानंतर ही संचिका माझ्याकडे आली. त्यात जिल्हा परीषदेचे प्रमाणपत्र आहे. पूर्वीचा जो रस्ता होता तो ३० फुट रूंदीचा होता आणि डिपी. रोड हा ८० फुटाचा आहे ५० फुटाचा मोबदला देण्यात यावा. म्हणून नमूद होते. ती संचिका मी क्लिअर केली त्यानंतर १५ ते २० मिनिटांनी माझ्या कडे तक्रार आली की, पूर्वी या प्रकरणामधे जागेचा मोबदला दिलेला आहे . त्यावर पुर्ण अभ्यास करण्यासाठी ती संचिका परत मागविली व संबधित अधिकाऱ्याना सुचना केली या संबधी मोबदला दिला आहे किंवा काय या बाबत लेखा विभाग मालमत्ता विभागाकडून अभिप्राय घ्यावे मोबदला दिला नाही. मी प्रशिक्षणासाठी गेलो होतो. तेथे मला कळविण्यात आले की सदर संचिका स्थायी समितीच्या समोर मान्यतेसाठी आहे. त्यावर मी उपआयुक्त महसूल हे प्रआयुक्त म्हणून सभागृहात बसणार होते त्यांना अशा सूचना केल्या की सभागृहाला असे कळवावे की आयुक्तांनी ही संचिका क्लेअर केलेली नाही प्रस्ताव स्थगित ठेवावा. या प्रकरणात पूर्वी मोबदला दिलेला आहे याची कल्पना मला नव्हती.हा प्रस्ताव स्थगित ठेवण्या बाबत संबधीत विभाग प्रमुख यांना सभागृहाला तशी माहिती देण्या बाबत कळविलेले होते. पंरतु जेव्हा मी परत आलो तेव्हा असे समजले की स्थायी समितीने या प्रस्तावात मान्यता दिलेली आहे. या प्रकरणी पूर्वी एफएसआय दिलेला आहे म्हणून दोन तीन नगरसेवकांनी माझ्याकडे पूरावे सादर केले त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. आणखी खोलवर गेल्यानंतर असे समजले की. दोन तीन या जागेचे मालक आहेत न्यायालयात प्रकरण चालू होते. त्यांनी आपसांत तडजोड केली.व ज्या बिल्डरने एफएसआय घेतलेला होता बिल्डरला एफएसआय घेतला होता. ९एकर१८ गुंठे क्षेत्र लेआऊट आहे.यात दोन तीन लोक कॉमन आहेत.ते तडजोडीमध्ये आहे व मोबदल्याच्या रक्कमेच्या मागणीमध्येही आहे. याचा अर्थ सरळ महानगरपालिकेला फसविण्याचा हा प्रकार आहे. सहाय्यक संचालक नगररचना यांना आदेश दिले त्यांना माहित असावे. त्यांना म्हणून संबधीत विभाग

प्रमूख यांना संबधीत लोका विरूध्द पोलीसात गुन्हा दाखल करण्याच्या सूचना केल्या त्यानुसार गुन्हा नोंद झालेला आहे. दरम्यानच्या कालावधीमधे साधारणत: ऑगस्ट महिण्यात मा. आमदार श्री. पाटील यांनी शासनाकडे तक्रार दिली की खाजगी वाटाघाटी च्या नावाखाली अनधिकृपणे महानगरपालिकेचे पैसे उचलण्याचा प्रकार चालू आहे त्यावर शासनाने अहवाल मागविलेला होता.मूळ जे पत्र होते त्या सोबत या जे दोन तीन जाहीर प्रगटन दिलेले होते त्याची प्रत त्यासोबत होती. त्यानंतर मी संबधीत अधिकारी यांना सुचनाही दिल्या की मागिल खाजगी वाटाघाटीतून जे प्रकरणात कार्यवाही झालेली आहे त्या संचिकेचा शोध घ्यावा तसेच मा.सभापती यांनी सुध्दा मागिल १० वर्षाच्या वाटाघाटी प्रकरणातील संपूर्ण संचिकेची तपासणी मुख्य लेखा परीक्षक यांना आदेशीत केलेले आहे यात प्रशासनाची स्थायी समितीची तसेच शासनाची फसवणूक करून एकदा मोबदला घेतलेला असतांना पून्हा मोबदला घेण्याचे जे काही प्रयत्न केलेले होते. म्हणून सखोल चोकशी होणे गरजेचे आहे. पोलीसात गुन्हा नोंद केलेला आहे. स्थायी समितीच्या निर्णयानूसार मुख्य लेखा परीक्षक हे चौकशी करतील. काही नगरसेवक व अधिकारी यांनी या प्रकरणा बध्दल पूढे येवून माहिती दिली म्हणून महानगरपालिकेची फसवणूक झालेली नाही.

श्री.जोशी संजय : पोलीसात गुन्हा नोंद करण्याचे मा.आयुक्तांनी आदेश केले त्याबध्दल अभिनंदन. परंतू त्या संचिकेवर मा.आयुक्तांची सुध्दा सही आहे. प्रशासनाच्या संगणमताने संचिका स्थायी समिती सभेपूढे गेली.

मा.आयुक्त :संचिकेवर माझी सही आहे. संचिका क्लेअर आहे. जिल्हा परीषदेचा रेकॉर्ड आहे.पूर्वी ३०फुटाचा रस्ता होता.८०फुट डी.पी. रोड आहे.. प्रशासनाची कमीत कमी चूक आहे. त्यात असे शब्द नमूद आहे कुणीतरी जानकार यांनी शब्द रचना केली आहे. ही संचिका शासनाकडे गेलेली होती. रस्ते झाले. पुर्वीचा ३० फुटाचा रस्ता होता. डिपी प्लॅननुसार ८०फुटाचा आहे. यात फसवणूक करण्याचा प्रकार होता. गेल्या १० वर्षात असे काही प्रकार घडलेले आहे का किंवा कुणी जाणून बुजून केलेले आहे का हे शोधणे आवश्यक आहे.

श्री.संजय जोशी :याचा अर्थ जाणकार हे प्रशासनातीलच अधिकारी असतील. त्यांनी करारनामा तयार केलेला असेल. प्रशासन सुध्दा यात सहभागी आहे व प्रशासनानेच हे उघडकीस आणलेले आहे. वृत्तपत्रात वाचले की, माजी कुलगुरू श्री.आर.पी.नाथ यांनी मा.आयुक्तांना पत्र दिले. मा.आयुक्त यांनी त्यांना हेरींगसाठी बोलाविलेले आहे. त्याचा त्या जागेशी काही संबध आहे का? आयुक्तांनी अशी काय चूक केली की त्यांनी २० मुद्दे नमूद करून मा.आयुक्तांना पत्र दिलेले आहे.

मा.आयुक्त : माजी कुलगुरू यांचे पत्र माझ्याकडे आलेले आहे. महानगरपालिकेची फसवणूक करण्याचा प्रयत्न झालेला आहे म्हणून पोलीसात गुन्हा दाखल केलेला आहे. गुन्हा दाखल केला तेंव्हा हे सुध्दा बघीतले नाही की ओनर कोण होते. ज्या ज्या लोकांनी अर्ज केले होते त्यांसर्वो विरूध्द गुन्हा दाखल केलेला आहे. न्यायालयात तडजोड झाली तेंव्हा ते डिफेन्ड होते.

श्री.संजय जोशी : केवळ माजी कुलगुरू आहे म्हणून हेरींगसाठी बोलविणार आहात का.

मा.आयुक्त : कुणीही अर्ज केले तरी हेरींग साठी बोलविणे आवश्यक आहे त्याचे म्हणणे ऐकूण घेणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. आज पुन्हा पत्र त्यांचे आलेले आहे की याचा एफएसआय घेतलेला आहे. हे मला माहितीच नव्हते.त्यांचा जागेवर क्लेम होता. माझा क्लेम असतांना एफएसआय कसा दिला त्यांना हेंरीग देणे हे प्रशासनाचे

कर्तव्य आहे.पोलीसात गुन्हा नोंद केलेला आहे. कोण दोषी आहे हे ठरविण्याचे काम पोलीसाचे आहे.

श्री.संजय जोशी :पोलीसात गुन्हा दाखल केला त्यात आर.पी. नाथ याचे नाव आहे ते चूकीने दिल्या गेले का ?

मा.आयुक्त :ज्यांनी अर्ज केले होते. त्यासर्वांवर गुन्हा दाखल करावा म्हणून सूचना दिलेल्याहोत्या त्यात आर.पी. नाथ यांचे नाव आहे का हे बघीतलेले नव्हते.कोणी जाणूनबूजून केले. कोण दोषी आहे हे तपासणीचे काम पोलीस करतील.

श्री.अ.रशिद खॉन :बाहेरील लोक भ्रष्टाचार करणार पुन्हा मा.आयुक्तांची परीक्षा घेणार हे बरोबर नाही.

श्री.संजय जोशी :हेरींग देत असतांना उदयाअसे होवू नये की ज्यांचेवर गुन्हा नोंद केलेला आहे त्यापैकी काहीचे नाव कमी करणे.

मा.आयुक्त : त्यातून कुणाचेही नाव कमी होणार नाही.

श्री.संतोष खेंडके :मा.आयुक्तांनाया प्रकरणात दोषी धरूनये त्यांनीच हे प्रकरण उघडकीस आणलेले आहे. व पोलीसात गुन्हा नोंदविण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. सबंधीत अधिकारी यांत दोषी आहे. त्यांनी स्थायी समिती समोर ठराव ठेवला. या बाबत अगोदर त्या विभाग प्रमुखानी तपासणी करणे आवश्यक होते. परंतू तसे झालेले नाही. संबधीत अधिकाऱ्याना दोषी ठरवावे. त्यांचेवर गुन्हे दाखल करावे.

श्री.संजय जगताप :चुक मान्य करून चालणार नाही. संबधीत अधिकारी यांचेवर पोलीस गुन्हे दाखल करावे. श्री. रामटेके यांची चुक नसतांना त्यांना निलंबीत केलेले होते. आर.पी. नाथ असेल किंवा अधिकारी असेल जे दोषी आहे त्यांचेवर गुन्हे दाखल करावेत.

श्री.मुजीब खान :ठराव स्थायी समिती समोर प्रशासनाच्या मंजूरीने आलेला नव्हता.या प्रकरणात नगररचना विभागाचे अधिकारी तसेच बाहेरील काही दलालांचे ग्रुप आहे.. महानगरपालिकेची फसवणूक करून पैसे उचलण्याचा प्रयत्न होता. प्रस्ताव मंजूरीसाठी आला त्यावेळी मी व स.सदस्य श्री. जागीरदार आम्ही या जागेचा मोबदला दिलेला आहे म्हणून मत मांडलेले होते. सन १९९०-९१ मध्ये सर्वे नंबर ५१,५२,५३ च्या बाबतीत ठराव आलेला होता त्यावेळी आम्ही विरोध केला होता यात मोठमोठया राजकीय लोकांचा हात होता या ठरावा बाबत मधे बोलू नये म्हणून मला धमकी ही देण्यात आली होती या डीपी रोड मधून काही जागेचा मोबदला दिला त्यानंतर एफएसआय दिला एक वेळेस झालेले नाही अनेकदा असे पैसे लाटण्याचा प्रकार झालेला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी व दोषीवर कार्यवाही करावी अशी माझी मागणी आहे.जे अधिकारी यात सामील आहे त्यांनाच तक्रारदार ठेवणे हे बरोबर नाही. गुन्हा नोंदविण्यासाठी उपआयुक्त होते त्यांना सुचना देणे आवश्यक होते.

मा.आयुक्त :गुन्हा दाखल करतो तेंव्हा असे असते की, मर्डर करतांना दिसते परंतु कोणी केले हे माहित नसते तरी पण गुन्हा दाखल करतो. तपासणीच्या वेळी पोलीस सर्व गुन्हेगारांना शोधतात. माझ्याकडे पोलीस चौकशी साठी येणारच आहे. त्यावेळी मी सर्वाचे नाव सांगणार आहे यात प्रशासन व स्थायी समितीची फसवणूक झालेली आहे.जे दोषी आहे त्यांना सजा झालीच पाहिजे.

श्री.संजय जोशी :यात मा.आयुक्त दोषी आहेत का हा माझा प्रश्न आहे.

श्री.मनमोहनसींग ओबेरॉय:मा.आयुक्त यात दोषी नाही. खालचे अधिकारी दोषी आहेत.

(याच वेळी सभागृहात स.सभासद मा.महापौर डायस समोर जाऊन मोठमोठयाने बोलातात काहीही ऐकू येत नाही)

मा.महापौर :सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. एका वेळी एकाच स.सदस्यांनी बोलावे.

श्री.संजय जोशी :मा.आयुक्तांची बाजू काही स.सदस्य घेत आहे. हे बरोबर नाही.
(याच वेळी सर्व स.सभासद आपआपल्या जागेवर जाऊन बसतात.)

मा.महापौर :मा.आयुक्त खुलासा करीत आहे. सर्वांनी शांततेने ऐकावे.

मा.आयुक्त :या प्रकरणात महानगरपालिकेच्या प्रशासनाची सरळ फसवणूक करण्याचा प्रयत्न केला आहे फसवणूक कोणी केली. त्यात कोणते अधिकारी सामील आहे. हे शोधणे तितके सोपे नाही. मागिल १० वर्षाचा रेकॉर्ड काढला त्यावर ज्यांची सही आहे त्यांनी सर्वानीच फसवीण्याचा प्रयत्न केला असेही म्हणता येणार नाही.माहिती नसतांना काही बाबतीत प्रकार घडला असेल या संचिकेत ज्यांनी ज्यानी सही केली असेल त्यातील कोणी कोणी फसवणूक केली व कोणास फसविले गेले याचा शोध होणे आवश्यक आहे गून्हेगार कोण आहे हे माहित नसते म्हणून पोलीसात गुन्हा दाखल करतो.जेंव्हा पोलीस तपासणीसाठी येतील तेंव्हा त्यांना सर्व माहिती दिली जाईल.यात जो कोणी फसवणूक करणार होते त्यांना शिक्षा झालीच पाहिजे .शेवटपर्यंत जो गुन्हेगार आहे त्यांना शिक्षा व्हावी.५० टक्के माझी , स्थायी समिती, सर्वसाधारण सभा व प्रशासनाची फसवणूक केलेली आहे. आपण सर्वानी पोलीसांना मदत करावी.१०० टक्के लोकांनी सहया आहे त्यांचेवर गुन्हे दाखल करणे असे म्हणणे योग्य होणार नाही.आता १० वर्षाचे रेकॉर्ड तपासले जातील प्रकरणात फसवणूक करणारे ७ ते ८ लोक दोषी निघतील असे वाटते मी व माझे प्रशासन पोलीसांना पूर्णपणे सहकार्य करणार आहे.शेवटपर्यंत सहकार्य करतील.

श्री.त्रिंबक तुपे :९ लोकांवरच गुन्हे दाखल करून हा प्रश्न सुटणार नाही तर यात जे कर्मचारी अधिकारी दोषी आहेत. लिपीका पासून ते विभाग प्रमुखापर्यंत सर्वांवर फौजदारी गुन्हे दाखल करावे मागिल १० वर्षाचे रेकॉर्ड तपासून सीआयडी मार्फत या प्रकरणाची चौकशी व्हावी .

श्री.देसरडा प्रशांत : या महानगरपालिकेत भ्रष्टाचार होवू नये व त्या संबधी चर्चा होते त्याबध्दल सर्वांचे अभिनंदन करतो. या प्रकरणात ५ ते ६ लोकांच्या मदतीने हा प्रस्ताव मा.आयुक्तापर्यत पोहचला आहे. या सदर्भात श्री.राठोड साहेबांनी आम्ही विनंती केली की, सदरील रस्ता महानगरपालिकेचा कोणता आहे,व कोणता रस्ता भूसंपादन करणार आहोत.परंतु तो रस्ता संबधीत अधिकारी यांना आम्हाला दाखवता आला नाही. रस्ता भुसंपादन करतांना शासनाचे नॉमस् असतात. या रस्त्याचे मजबुतीकरण केंव्हा झाले.ती संचिका सुध्दा आज रोजी सापडत नाही.त्या संचिकेमधे पूर्वी काय अभिप्राय होते हे दिसून आले असते परंतु ती संचिका मिळत नाही अशी परीस्थिती आहे.माझ्याकडे नकाशा आहे. ज्या रोडच्या लेआऊट मध्ये जे इंटरनल रोड सोडले आहे. त्याचा मोबदला सुध्दा संबधीत मालक मागणी करीत होते.सन २००१ मध्ये त्या रस्त्याची रजिष्ट्री सुध्दा महानगरपालिकेला करून दिलेली आहे. याचा पुरावा प्रशासनाकडे आहे. याचा अर्थ सर्व माहिती प्रशासनास आहे. ज्या प्रमाणे ९ लोकावर गुन्हे दाखल केलेले आहे त्याप्रमाणे ज्या अधिकाऱ्यानी प्रस्ताव ठेवला त्या संबधी चोकशी करून त्यांना निलंबीत करून कार्यवाही करावी असे पत्र मी मा. महापौरांना दिलेले आहे. जो पर्यंत चौकशी चालू आहे तो पर्यत त्या त्या विभागाचे कर्मचाऱ्यांच्या बदल्या करून प्रश्न सुटणार नसून मा.सभापती यांनी चौकशी समिती नियुक्त केलेली आहे. जो पर्यत चौकशी समितीचा अहवाल येत नाही तोपर्यत या अधिकारी कर्मचारी यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे जेणे करून चौकशी मधे काही अडथळे येणार नाही. सुधारीत रेखांकन दाखल करता येईल का याचाही प्रयत्न होऊ शकतो. सर्व

संचिका मा.आयुक्त यांचेकडे सुपुर्त कराव्या जेणे करून चौकशी योग्य प्रकारे होईल. असे माझे मत आहे.

मा. महापौर :ज्याही अशा प्रकरणाच्या संचिका असतील त्या मा.आयुक्तांनी त्यांचे ताब्यात घ्याव्यात.अशी सुचना देण्यात येतात.

श्री. मिलींद दाभाडे :या ॅ प्रकरणी श्री. राठोड साहेब दोषी दिसतात त्यामूळे त्यांना सह आरोपी करून त्याचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश करावेत नंतर पुढील चौकशी करण्यात यावी.

श्री. जागीरदार अजीज :कोणत्या दोन पदाधिकारी यांनीमा.आयुक्तावर दबाव आणून ही संचिका पुढे पाठविण्यास सांगितले खुलासा घ्यावा. हे जनतेला माहित झाले पाहिजे. सन २००१ मध्ये एफएसआय दिला गेला त्यानंतर २००२ मधे डीपी प्लॅन झाला.

मा.महापौर :या संबधी मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :सन २००१ मध्ये जी परवानगी दिली आहे त्यात काही चूक आहे का हे तपासणी केली जाईल.चूक असेल तर सभागृहासमोर ठेवण्यात येईल. दुसरे असे की मला कोणी दुरध्वनी केले कोणी मदत केली ते आताच सांगू शकत नाही. परंतु पोलीस जेंव्हा माझ्याकडे चौकशीसाठी येतील त्यावेळी सर्व माहिती त्यांना दिली जाईल.

मा.महापौर :सन २००१ मध्ये एफएसआय दिला सन २००२ मध्ये डी पी प्लॅन मंजूर केला डी पी प्लॅन मंजूर होणार त्या अगोदर एफएसआय देता येतो का याचा खुलासा करावा.

मा.आयुक्त : या बाबतीत संपूर्ण चौकशी केली जाईल.

श्री.मनमोहसिंग ओबेरॉय :सन २००२ मध्ये जो डीपी प्लॅन मंजूर केला तो रिवाईज होता.२००१ मध्ये ही डीपी प्लॅन होता. १९९० मध्ये ही होता.

मा.महापौर : प्रशासन खुलासा करीत आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे :वार्ड क्र ९० मध्ये महानगरपालिकेची खुली जागा आहे त्या जागेवर माधवराव घोरपडे यांनी अतिक्रमण केलेले आहे. अनेक वेळा विनंती केलेली आहे. परंतु कार्यवाही करण्यात आलेली नाही. ज्या अधिकाऱ्यांनी श्री. घोरपडे यांना बांधकाम परवानगी दिली आहे त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

मा.महापौर :आपला प्रश्न वेगळा आहे गारखेडा भुखंडा चा विषय संपल्यानंतर त्यावर चर्चा करण्यात येईल.

श्री. संतोष खेंडके : १६ सप्टेंबरला प्रधान सचिव मा. श्री. नानासाहेब पाटील यांचे पत्र प्रशासनाकडे आलेले आहे ते या संचिकेला लावण्यात आलेले नाही.त्याबाबतीत खुलासा घ्यावा.

मा.आयुक्त :शासनाचे जे पत्र आलेले आहे त्या सोबतच मा.आमदार यांचे पत्र सोबत दिलेले आहे.भ्रष्टाचाराचे आरोप केलेले आहे. आताच मी माझ्या खुलाशामध्ये सांगितलेले आहे.त्या पत्रामध्ये पन्नालालनगर येथील ८० ते ९० मोबदला दिला त्यांचाही उल्लेख आहे.त्या संबधीचा अहवाल शासनास पाठविण्यात येणार आहे त्या पत्रासोबत एक झेरॉक्स प्रत आहे.जे तीन जाहीर प्रगटन केलेले होते त्याची प्रत आहे.त्या बध्दलची संपूर्ण माहिती शासनास दिली जाईल.

श्री.संजय सिरसाट :या बाबतीत गेल्या १५ दिवसापासून वृत्तपत्रात बातम्या येत आहे. महानगरपालिकेचे पैसे वाचविण्याचा ज्यांचा हेतू होता अशा नगरसेवकांनी आपआपल्या पध्दतीने मा.आयुक्तांकडे निवेदने दिलेली आहे. वृत्तपत्रात बातम्या येतात त्यावर जरी विश्वास नसला तरी मा.आयुक्तांनी यावर खुलासा केलेला आहे. या प्रकरणात असे दिले की यात अधिकारी व पदाधिकारी गुंतलेले आहे. सदर संचिका ही २००१ पासून ते २००५ पर्यत चालू होती. चार आयुक्तांच्या त्यावर सहया असून अनेक अधिकाऱ्यांच्या सहया झालेल्या आहेत. सध्याचे

आयुक्त यांची सुध्दा त्यावर सही आहे. व हा प्रस्ताव स्थायी समिती समोर मंजूरीसाठी देण्यात आला. जेंव्हा स्थायी समिती समोर प्रस्ताव आला त्यावेळी मा.उपमहापौर यांनी पत्र दिले म्हणून ती संचिका थांबविण्यात आली. त्यांचे खऱ्या अर्थाने अभिनंदन केले पाहिजे.दिनांक १७.८.२००५ मा.उपमहापौर यांनी पत्र दिले होते एखादया प्रकरणात भ्रष्टाचार होतो हे नगरसेवकांनी सांगण्यापेक्षा संबधीत विभाग काय करीत होते. असा प्रश्न पडतो. रिवाईज प्लॅन मंजूरीसाठी गेलेला होता जो पर्यत मंजूरी होवून येत नाही तोपर्यत एफएसआय देणे कितपत योग्य आहे. या प्रकरणात एक अधिकारी नाही लिंक आहेत. ज्या नगरसेवकांनी मा.आयुक्तांना मदत केली त्याचे उघडपणे नाव घेवून त्याचे अभिनंदन केले पाहिजे.मा. उपमहापौर यांनी पत्र दिल्यानंतर सुध्दा मा.आयुक्तांशी मी चर्चा केलेली होती. त्या संचिकेमधे गडबड आहे ती थांबवावी म्हणून विनंती केली.दोन महिने सदर सचिका पूढे यायलाच तयार नाही या महानगरपालिकेत जागेचे प्रकरणे असेल किंवा वैयक्तीक असेल नगरसेवकांचा कुणाचा तरी संबध येतो त्या संचिकेवर कार्यवाही होत नसेल तर पूढे जाऊ दया असे मी म्हटले त्यात काही चुक निघाली तर काय करणार म्हणून आयुक्तांनी म्हटले तेंव्हा मी त्यांना म्हटले की मालमत्ता व लेखा विभागाचा अभिप्राय घेवून कार्यवाही करावी मी सांगितल्या नुसार मा.आयुक्तांनी तसा शेरा दिला त्यानंतरच पैसे दयावे तो पर्यत देवू नका हा अधिकार तुमचा आहे असे म्हटले मा.आयुक्त कोलबोंला गेले आल्यानंतर त्यांनी मला म्हटले सदर प्रकरणात आपण सल्ला दिला नसता तर मला ही जेलमधे जावे लागले असते. या पैशाच्या सुया ज्या आहेत त्या अधिकाऱ्यावर गेलेल्या आहे यामधे ज्या नगरसेवकांनी कागदपत्र दिले त्यांना वैयक्तिक हेरींगसाठी बोलवावे पोलीसांना विनंती करावी की आताच एक सदस्यांनी म्हटले की या प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी झाली पाहिजे.असे प्रकरण एकदा तरी सीआयडी कडे गेलेच पाहिजे जे रॅकेट आहेत ते एकदा उघड होऊ दया, अधिकाऱ्याना निलंबीत करणार पून्हा कामावर घेणार हा प्रकार होवू नये म्हणून आयुक्तांना विनंती की पोलीस आयुक्त यांना विनंती करावी की या प्रकरणाची तातडीने चौकशी करायची आहे सर्व नगरसेवकांची मागणी केली आहे असे नमूद करावे आम्ही सर्व सदस्य मिळून निवेदन देतो याप्रकरणाची तातडीने संपूर्ण चौकशी होण्यासाठी विनंती करावी.

मा.आयुक्त : या प्रकरणाची माहिती स.सदस्य श्री प्रशांत देसरडा व श्री शंशांक विसपूते यांनी दिली त्याचे मनापासून आभार मानतो. पुरावे दिले आणि माझी नक्की खात्री झाली उदा. प्रशासनाची चुक झाली असती तर आम्ही दोषी आहे असे आपणच म्हटले असते.कोण गुन्हेगार आहे ते आताच सांगता येणार नाही.माझी फसवणूक झाली प्रकरणांत चौकशी होईल मी पूर्ण माहिती देणार .

श्री.संजय जगताप : १५८५४ ही खुली जागा आहे. या संबधी तक्रार केलेली आहे की या जागेवर अतिक्रमण झालेले आहे.

मा.महापौर : या संबधी प्रशासकीय अधिकारी खुलासा देण्यासाठी नाही ते आल्यानंतर खुलासा घेवू.

श्री.दिलीप गायकवाड :ज्या लोकांवर पोलीसात गुन्हे दाखल केले ते करू नये म्हणून आमदार किंवा खासदार यांचे मा.आयुक्तावर प्रेशर आलेले होते का माहिती देण्यात यावी.या प्रकरणात दोन ते तीन अधिकारी गुंतलेले आहे. काही मदत पडल्यास मी मदत करणार आहे.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर :ज्या दोन नगरसेवकांनी प्रशासनास माहिती दिली त्याचे सभागृहातर्फे अभिनंदन करतो तसेच आयुक्ताच्या लक्षात आल्यानंतर चौकशी व पोलीसात गुन्हा नोंद करण्याच्या सुचना आयुक्तांनी दिल्या त्याबध्दल त्यांचेही अभिनंदन करतो.या सभागृहात जेष्ठ सदस्य आहे.त. त्यांना सर्व माहिती आहे. जे जे कागदपत्र समोर आलेले आहे त्यात पदाधिकारी सुध्दा असतील असासंशय आहे. ज्यांना ज्यांना या बाबतीत माहिती आहे असे सर्व नगरसेवक पोलीससमोर जबाब देवू शकतात. स्वत:च्या फायदयासाठी जर अधिकाऱ्याना कोणी टारगेट बनवत असतील तर ते अधिकाऱ्यानी सुध्दा हाणून पाडावे. अधिकाऱ्याना जी जी माहिती आहे ती सर्व पोलीसांना सागांवी. सत्य परीस्थिती काय आहे त्यावर चर्चा होणे अपेक्षीत आहे. सभागृहाला जशी माहिती दिली जाते तशी प्रशासनाने व पदाधिकारी यांनी सत्य माहिती प्रेसला दयावी जेणे करून जनतेला खरी माहिती मिळाले. आणि मा.सभापती यांनी १० वर्षाची प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेशीत केलेले आहे जे दोषी निघतील त्यांचेवरही पोलीस गुन्हा नोंद करावा अशी मागणी करीत आहे. वृत्तपत्रात आलेल्या बातम्याचा खुलासा प्रत्येकवेळी व्हावासंस्थेची बदनामी होते.

श्रीमती अलका पाटील :अधिकाऱ्यानांच दोषी न ठरवता इतर दोषी असतील.सर्व या वर अभ्यास करावा व तसा निर्णय दयावा. चोर सोडून सन्यासाला फाशी नको,

मा.महापौर :गारखेडा प्रकरणातील जेवढयाही संचिका असतील त्या मा.आयुक्तांनी ताब्यात घ्याव्यात.जे फसवणूक करण्याचा प्रयत्न करीत होतेत्याचेवर पोलीसात गुन्हा दाखल केलेला आहे. या प्रकरणात काही अधिकारी पदाधिकारी असतील तर आरोप सिध्द झाल्यानंतर त्यांचेवरही मा.आयुक्तांनी पोलीस गुन्हा नोंद करावा. व मा.सभापती यांनी जे निर्देश चौकशी संबधी दिलेले आहे त्या संबधीचा अहवाल स्थायी समितीच्या सभागृहास व या सभागृहास ही देण्यात यावा.

श्री.संजय सिरसाट :माझ्या वार्डात खुल्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे.त्याचा खुलासा घेण्यात यावा.

मा.महापौर :शहरात जे ही बांधकाम रिझरवेशन चालू आहे ते नियमानुसार सर्वच्या सर्व पाडण्यात यावे.

श्री.सिताराम सुरे :गुंठेवारी भागात विकास कामे होत नाही स्थायी समितीने मान्यता दिली तरी विकास कामे होत नाही त्या भागात मालमत्ता कर वसूल केला जातो कामे होत नसेल तर कर कशासाठी भरणा करायचा असा जनतेचा प्रश्न आहे. किमान नगरसेवक स्वेच्छा निधीतून तरी विकास कामे व्हावीत अशी विनंती आहे.

मा.महापौर :स्थायी समितीमध्ये या संदर्भात चर्चा झालेली आहे. मा.सभापती यांनी आदेश केलेले आहे त्याप्रमाणे प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

डॉ.भागवत कराड :या शहरात ११७ अनधिकृत वसाहती आहेत त्या भागात गुठेवारी कायदा लागू करावा व त्यानंतर विकास कामे करावी असा निर्णय मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता. कालच्या स्थायी समितीमधे सुध्दा या संदर्भात चर्चा झालेली आहे.देखभाल दुरूस्तीची सुध्दा कामे होत नाही. ११७ वसाहतीत किमान देखभाल दुरूस्तीची कामे झाली पाहिजे. इतर महानगरपालिकेत अशा वस्त्यात विकास कामे होता. या वसाहतीतील नागरीकांना त्रास होतो. प्रशासन काम करणार आहे की नाही खुलासा घेण्यात यावा.आताच स.सदस्य श्री. सुरे यांनी म्हटले की त्यांचे वार्डातील लोक टॅक्स भरतात. विकास कामे का होत नाही, खुलासा घेण्यात यावा.

मा.महापौर :११७ ज्या अनधिकृत वसाहती आहे त्या गुठेंवारीमधे नियमित कशा तात्काळ करता येतील यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावेत.यासाठी सर्व नगरसेवक मदत करतील.जो पर्यत या वसाहती नियमीत होत नाही तोपर्यत या भागात देखभाल दुरूस्तीची कामे करण्यात यावी. त्यासाठी स्वतंत्र बजेट ठेवण्यात आलेले आहे.

डॉ. भागवत कराड :प्रशासनास आदेश करूनही कामे होत नाही. प्रशासनाचे मत घ्यावे. दोन कोटी बजेट ठैवलेले आहे त्यातून ही कामे करण्यात यावी.

श्री.सय्यद खुसरो :अनधिकृत वसाहतीमधे विकास कामे करण्यात यावी.

मा.आयुक्त :या शहरात मोठी अडचण म्हणजे गुंठेवारीचीआहे. या संदर्भात शासनाचे वेळोवेळी मार्गदर्शन घेतलेले आहे. शासनाने गुंठैवारी करण्याची जी अडचण होती ती दूर केलेली आहे. तसे लेखी आदेश शासनाचे आलेले आहे. पूर्ण राज्यातील महानगरपालिकेसाठी तो कायदा लागू पडला आहे. १०-२० रूपयाच्या बॉण्डवर जे खरेदीखत केलेले होते . तेच कायदेशीर पुरावा म्हणून गृहीत धरावे असे शासनाचे आदेश आलेले आहे. या वसाहतीचे रेग्यूलेशन लवकर व्हावे म्हणून तसा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवला होता त्यास मान्यता ही मिळालेली आहे.गुंठेवारी अंतर्गत सहा एजन्सी सर्वेचे काम करीत आहे. गुंठेवारी मधे अंदाजपत्रक सुध्दा करून देत आहे .म्हणून गुठेवारीमधे तो भाग रेग्युलाईज करण्यासाठी आपण सर्वानी नागरीकांना प्रवृत्त करावे.मालमत्ता कर सर्वच भरतात. परंतु जेंव्हा इमारत बांधकाम होते तेंव्हा विकास खर्च घेतला जातो. त्या घरा भोवताली सर्व सोयी झाल्या पाहिजे. गुंठेवारी तील लोक रस्त्याचा वापर करतात म्हणून कर वसुल करतो. हा चार्ज नाही. मालमत्तेचा कर सर्वांनी भरावा त्यांचेच भागात विकास कामे होणार आहे. सर्वेचे काम बरेच झालेले आहे. नकाशा वगैरे काढून कार्यवाही होत आहे. वर्क ऑर्डर दिल्या आहे . सुरूवातीस १०० रूपये खर्च येईल. तो महानगरपालिका करीत आहे.सर्वेक्षणासाठी पैसे देण्याची तुर्त नागरीकांना गरज नाही त्यानंतर ७०० रूपये मालमत्ता धारकांनी भरावयाचे आहे त्यात २००रूपयाचे ॲफिडेव्हिट आहे ५००रूपये एजन्सी खर्च घेणार आहे. एका वसाहतीत कमीत कमी ७० टक्के लोकांनी रेग्यूलाईज केल्या नंतर तेथे विकास कामे करता येतील.

सौ. लता दलाल :बॉण्ड वगैरे गृहीत धरण्यात यावे म्हणून हे काही नवीन नाही. पूर्वीच शासनाचे आदेश होते..पी.आर कार्डची अट रद्य करावी म्हणून अनेक नगरसेवकांनी विरोध केला होता. या शहरात १९७१ पासून अनधिकृत वसाहती आहे. त्या आजही गुठैंवारी म्हणून संबोधल्या जाते.या वसाहतीमधे पूर्वी सर्व सुविधा दिलेल्या आहेत. सन २००२ पासून बंद झालेल्या आहेत. त्या भागातून टॅक्स वसूल केला जातो. पथकर भरतात, वृक्षकर भरतात, पाणी पट्टी भरतात, व त्या भागात देखभाल दुरूस्तीची कामे होत नसेल किंवा करता येत नसेल तर ते अत्यंत चूकीचे आहे. या वसाहतीमधे देखभाल दुरूस्तीची कामे झालीच पाहिजे तसा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा.पुणे , नाशिक, नागपूर तसेच अमरावती महानगरपालिकेत अशा वसाहतीमधे कामे करण्यास बंधन नाही. विकास कामे होतात. राज्यातील सर्वच महानगरपालिकेला एकच कायदा असतो. या महानगरपालिकेसाठीच वेगळा नियम का अमलात आणला जातो. या वसाहतीमधे देखभाल दुरूस्तीची कामे करण्यासाठी बजेट ठेवण्यात आलेले आहे. प्रशासनाने त्याची अमलबजावणी करावी.

श्री.मो.जावेद मो.इसहाक :अनाधिकृत वसाहतीमधे देखभाल दुरूस्तीसाठी अर्थसंकल्पात अडीच कोटीची तरतूद केलेली आहे त्यातून या भागात कामे होणार आहे की नाही खुलासा घेण्यात यावा.

सौ.खान अजरा जबीन :अनधिकृत वसाहतीतून सन १९९५ पासून निवडणुका होत आहे. तेथील नागरीकाचे मतदान घेतले जाते. अधिकृत नगरसेवक म्हणून निवडून येतात तसेच सन २००० मधेही निवडणूक घेण्यात आलेली होती.असे असतांना तो भाग अनधिकृत कसा होवू शकतो. अनाधिकृत वसाहतीत ड्रेनेज, लाईट, रस्ते तसेच पाण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. सन २००१ पर्यत विकास कामे झालेली असून त्याची देखभाल दुरूस्तीची कामे करण्यात यावी अशी सर्वांची मागणी आहे.

श्री.कोकाटे काशिनाथ :अनधिकृत भागात अनेक वर्षापासून विकास कामे होत होती. सन २००१ मधे अनधिकृत वसाहती हया गुंठेवारी कायदयानुसार अधिकृत करण्याचा निर्णय घेतला व अशा वसाहतीत त्यापूर्वीच इमारतीचे बांधकाम झालेली होती.त्यामधे २००१ पूर्वी त्या वसाहतीमधे रस्ते, ड्रेनेज , लाईट तसेच पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. या कामावर देखभाल दुरूस्तीची कामे सुध्दा न करण्याचा एकतर्फी निर्णय येथील अधिकाऱ्यानी घेतलेला आहे. औरंगाबाद महानगरपालिका वगळता संपूर्ण महानगरपालिका मधे पूणे अहमदनगर, महानगरपालिकेस मा.सभागृह नेता तसेच इतर पदाधिकारी यांनी भेट दिली असता त्या महानगरपालिकेत अशा वसाहतीत नगरसेवक तसेच लोकप्रतिनिधी जे की आमदार , व खासदार निधीतून विकास कामे करण्यात येतात. आजही कामे केली जात आहे. या महानगरपालिकेच्या हद्दीतील अनधिकृत वसाहतीमधे अनेक विकास कामे झालेली असून आता देखभाल दुरूस्तीची कामे होत नाही.अर्थसंकल्पात अडीच कोटीची तरतूद या भागात विकास कामे करण्यासाठी ठेवण्यात आलेली आहे कालच्या स्थायी समितीमधे सर्व सभासदांच्या सम्मतीने ठराव पास करून अशा वसाहतीत देखभाल दुरूस्तीची कामे व्हावीत म्हणून मान्यता दिली. अशा भागात कामे करण्यास शासनाची कोणतीही अडचण नाही. परंतु अधिकारी हे मनमानी करीत आहे. एखादा जमिनीच्या भुसंपादनाचा विषय असल्यास त्यावर एका दिवसात अभिप्राय येतात. परंतु सर्व सामान्य जनतेच्या कामासाठी वेळ लागतो कामे केली जात नाही. अनधिकृत वसाहतीमधे देखभाल दुरूस्तीची कामे करू नये म्हणून शासनाचे कोणतेही पत्र नाही. असेल तर प्रशासनाने दाखववावे. परंतु विकास कामे करायची नाही म्हणून केली जात नाही. ११७ अनधिकृत वसाहतीत जे अडीच लक्ष नागरीक राहतात ८३कोटी जी जकात येते त्यात त्यांचा हिस्सा आहे. त्याचे मूळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडते हे विसरता येणार नाही. त्या नागरीकांच्या हक्कावर गदा आणू नये.त्यानागरीकांच्या भागात विकासकामे झालीच पाहिजे हे सर्व सभागृहाचे मत आहे.जनतेच्या पैशातूनच कारभार चालतो. देणगीतून चालत नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:अडीच कोटी बजेट मधे तरतूद केलेली आहे त्यातून यावसाहतीत देखभाल दुरूस्तीची कामे करण्यात यावी.स्वेच्छा निधी कोठेही खर्च करण्यात येईल.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :गुंठेवारीतून प्रशासन शासन मार्ग काढण्यास यशस्वी झालेले आहे. अनधिकृत वसाहतीतमधे यापूर्वी विकास कामे झालेली आहे देखभाल दुरूस्तीची कामे करावी लागणार आहे ज्या वसाहतीमधे लोक राहतात त्यांना सुखसोयी देण्याचे काम महानगरपालिकेचे आहे. अर्थसंकल्पात अडीच कोटीची तरतूद या वसाहतीमधे

| | |
|---|---|
| | विकास कामे करण्यासाठी ठेवलेली आहे. त्यातून देखभाल दुरूस्तीची कामे करण्यात यावी . |
| डॉ.भागवत कराड | :५० टक्के नगरसेवक हे अनधिकृत वसाहतीतून निवडून आलेले असून एका वार्डात किमान १० हजार लोकसंख्या आहे.या भागात २००१ पूर्वी विकास कामे झालेली असून नगरसेवक स्वेच्छानिधी तसेच आमदार खासदार निधीतून कामे करण्यास प्रशासनास काय अडचण येत आहे. यापूर्वी झालेल्या विकास कामावर देखभाल दुरूस्तीची कामे करण्याचे आपण आदेशीत केलेले आहे त्यांची अमलबाजवणी करण्यात यावी. |
| श्रीमती अलका पाटील | :यापूर्वी नगरसेवक स्वेच्छानिधीतून ए-१ ची २५ हजाराची विकास कामे टेडंर न काढता केली जात असे परंतू आता तसे होत नाही. बजेट उशीरा मंजूर झालेले असून विकास कामे करण्यास वेळ कमी आहे. पूर्वीप्रमाणे टेडंर न काढता ए-१ ची कामे करण्यात यावी. |
| श्री.अ.रशिद खान | : १९९५ मध्ये अनधिकृत वसाहतीचा सर्वे होवून त्याचे बुकलेट तयार करून शासनास दिलेले होते. त्यावेळी मा. श्री. जोशी साहेब मुख्यमंत्री होते. या वसाहतीत कामे करण्यासाठी शासनाने त्यावेळी १० कोटीचा निधी उपलब्ध करून दिलेला होता.त्यावेळी कामे करण्यात आलेली होती असे असतांना त्या वसाहती अनधिकृत कशा होवू शकतात. अनधिकृत असेल तर कामे का करण्यात आली व अधिकृत असेल तर आता विकास कामे करण्यात यावी. |
| श्री.सय्यद खुसरो | :जून्या वसाहती हया गुंठेवारीत येवू शकत नाही. |
| मा.महापौर | : स.सदस्य श्री. अ. रशिद खान (मामू), यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा. |
| शहर अभियंता | : यापूर्वी अनधिकृत वसाहतीचा सर्वे केलेला आहे ज्या वसाहती येतात त्याचे बुकलेट तयार करण्यात आले होते. सन २००० पर्यत या भागात विकास कामे करण्यात आलेली आहे. कामे केली असली तरी त्या अधिकृत वसाहती होवू शकत नाही. त्यासाठी अनेक बाबी अंर्तभूत असणे आवश्यक आहे. |
| मा.उपमहापौर | :अधिकारी अभ्यास न करता सभागृहात उत्तरे देतात. मा.आमदार श्री बागडे साहेबाच्या निधीतून काम करण्याबाबत पत्र दिले तेंव्हा अनधिकृत वसाहतीमधे कामे करता येत नाही म्हणून कळविण्यात आले परंतू आमदार श्री दर्डा साहेब यांचे निधीतून बालाजीनगर अरीहंतनगर भागात हातपंपाचे काम करण्यात आले. विचारणा केली असता सदर काम सहा.संचालक नगररचना यांचे मार्फत करण्यात आले.असे सांगण्यात आले. याचा अर्थ प्रशासन वेगळे व अधिकाऱ्याचे काम वेगळे चालते का?काम करायचे नसल्यास वेगळे नियम दाखवले जातात व काम करायचे असल्यास वेगळे, सभागृहाची दिशाभूल केली जाते. |
| सौ. लता दलाल | :सन २००० पर्यत विकास कामे होऊ शकतात आज अनधिकृत कसे होईल. |
| मा.आयुक्त | : एमआरटीपी ॲक्ट नुसार ज्या वसाहतीचा विकास झालेला आहे त्यास अधिकृत वसाहती म्हणू शकतो. एमआरटीपी ॲक्ट लागू नव्हता त्यापूर्वीची जी बांधकामे आहेत त्यास परवानगीची आवश्यकता नव्हती ते गावठाण होते त्यास अनधिकृत म्हणू शकत नाही. जेंव्हा पासून इमारत परवानगी घेण्याचे बंधनकारक झालेले आहे त्यानंतरच्या ज्या वसाहती झालेल्या आहेत त्या गुठेंवारीत येतील.सन २००१ मधे गुंठेवारीचा कायदा झाला.गुंठेवारी मधे अडचण ही असते की या भागात काही लोकांनी प्लॉट विकलेले असतात तेथे रस्ते वगैरे हे महानगरपालिकेच्या ताब्यात नसतात त्यामूळे तेथे खर्च करता येत नाही.सन २००० च्या नंतर |

महानगरपालिकेने सुध्दा त्या भागात विकास कामे केलेली नाही.प्रशासनाचे मत आहे व शासनाचे सुध्दा हे मत आहे की हया वसाहती नियमाधीन होवू शकतात.किमान ५० टक्के लोकांनी रेग्यूलेशन केले तर त्या वसाहतीत सर्व कामे करू शकतो. कारण ते रस्ते गुंठेवारी कायदयाप्रमाणे आपोआप महानगरपालिकेच्या ताब्यात येतात.या भागात ड्रेनेज व पाणी पुरवठयाची कामे करण्यास लिगल अडचण नाही परंतू रस्ते ,नवीन ड्रेनेज लाईन वगैरे करण्यास अडचण आहे.

श्री.मुजीब खान :प्रशासन कोणत्या वसाहती अधिकृत व अनधिकृत आहे असे संबोधतात. सर्वे केल्याचा रेकॉर्ड प्रशासनाकडे आहे का?ज्या वसाहती हया ५० वर्षापूर्वीच्या आहेत त्या अनधिकृत मधे येवू शकत नाही. त्याचे रेकॉर्ड आहे का?अनधिकृत व अधिकृत वसाहती कोणत्या त्याचा सर्वे करण्यात यावा.स्वेंच्छा निधीतून विद्यूत देखभाल दुरूस्तीचे कामे करावे.

माा.महापौर :गुंठेवारीच्या बाबतीत प्रशासनास असे आदेश देण्यात येत आहे की,गुंठेवारीच्या भागात बजेट मधे जो निधी ठेवलेला आह. तो ड्रेनेज व पाणी पुरवठयाच्या कामासाठी वापरावा व नगरसेवक स्वेच्छा निधीतून लाईटची कामे करण्यात यावी. व सर्व स.सदस्यांनी गुंठेवारी कायदा लागू करण्या साठी प्रयत्न करावे व लवकरात लवकर अनधिकृत वसाहती हया लिगल कशा होतील यासाठी प्रशासनास मदत करावी.अर्ध्या तासासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ दुपारी २.०० वाजता सभेला सुरूवात दुपारी ३.०० वाजता)

श्री.बाबासाहेब डांगे :या शहरात एकूण पेट्रोल पंप किती आहे म्हणून प्रशासनास पत्र दिलेले होते. यादी मागविलेली होती उत्तर देण्यात आलेले नाही तसेच बऱ्याच पेट्रोल पंप धारकानी महानगरपालिकेची तसेच अग्निशमन दलाची एन ओ सी घेतलेली नाही असे निदर्शनास आलेले आहे. यावर काय कार्यवाही करणार आहे.

मा.महापौर : या संदर्भात दोन दिवसात मा.आयुक्त यांनी स.सदस्य यांना लेखी माहिती देण्यात यावी व नियमानुसार त्या पेट्रोल पंप धारकावर कार्यवाही करावी.

श्री.त्रिंबक तुपे :सर्व पेट्रोल पंप धारकांना एनओसी घेण्याची आवश्यकता आहे असे असतांना त्यांचेकडे एनओसी नाही. ज्यांचेकडे थकबाकी आहे ती सुध्दा वसूल करण्यात यावी.

श्री.बाबासाहेब डांगे :जालना नाक्या जवळ एक पेट्रोल पंप आहे त्यांचेकडे १२ लक्ष थकबाकी आहे. ती वसूल करण्यात यावी.

मा.आयुक्त : किती पेट्रोल पंप आहे याची माहिती घेवून त्यांचेकडे एनओसी आहे किंवा नाही याची माहिती घेण्याचे काम सुरू केलेले आहे. त्यांचेकडे किती वसूली आहे. ही सर्व माहिती स.सदस्यांना दिली जाईल.जी थकबाकी त्यांचेकडे असेल ती वसूल केली जाईल.

श्री.त्रिंबक तुपे :प्रशासकीय विभागात इमारत निरीक्षक किती आहे.माझ्या माहिती प्रमाणे ९ कार्यरत होते. सध्या ३ इमारत निरीक्षक कार्यरत आहे. काही निलंबीत केलेले आहे. त्या विभागात गेल्यानंतर एक ही इमारत निरीक्षक दिसत नाही. शहराचा परीसर मोठा आहे. आणखी इमारत निरीक्षक वाढविण्याची गरज आहे.

श्री.कटकटे सतीश :मा.आयुक्त हे कोलंबोला प्रशिक्षणासाठी जाण्यापूर्वी ज्या अधिकाऱ्यांना कामावर घेण्यात आले त्यांना कोणत्या कारणासाठी निलंबीत केले होते व कोणत्या बेसवर घेण्यात आलेले आहे याचा खुलासा करावा.

मा.महापौर :या विभागात इमारत निरीक्षक जास्तीचे कसे देता येतील यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी. तसेच या पदावर माजी सैनिकांना घेता येत असेल तर तशी

कार्यवाही करावी. व पूढील बैठकीत तसा अहवाल सादर करावा व हा विभाग सक्षम कसा होईल यासाठी प्रयत्न करावे.

श्री.संजय जोशी : सुरक्षा रक्षक यांना एक सारख्या रंगाचा गणवेश असावा. ते त्यांना दिवाळी पूर्वी देण्यांत यावा.

मा.महापौर : महापालिकेचे जेव्हढे सुरक्षा रक्षक आहेत, त्यांना एकाच खाकी रंगाचा चांगल्या प्रतीचा रेमण्ड व डिग्जाम या कंपनीचा गणवेश मा.आयुक्त यांनी निवड करून दिवाळीपूर्वी देण्याची व्यवस्था करावी.

श्री.मुजीब खान :माझ्या वार्ड व इतर बाजूच्या वार्डात एकही इमारत निरीक्षक गेल्या दोन तीन महिण्यापासून येत नाही. अनधिकृपणे बांधकाम चालू आहे. प्रशासनाचे याकडे लक्ष नाही.

मा.महापौर :प्रशासकीय अधिकारी यांनी यांची दखल घ्यावी.

सौ.लता दलाल :.९ अभियंते यांना निलंबीत करण्यात आले. ही कार्यवाही करतांना शासनाचे नियम दाखविण्यात आले. त्यांचेवर गुन्हे नोंदविण्यात आले. परंतु महाराष्ट्र शासनाने सुध्दा इतर जे शासकीय सेवेत अभियंते आहेत त्यांना निलंबीत केलेले नाही. या निलंबीत अभियंत्यांना ७५ टक्के पगार देण्यात येतो. या महानगरपालिकेला अभियंत्यांची आवशयकता आहे आताच म्हटले की इमारत निरीक्षक नाही.अभियंते नाहीत. त्यांना कामावर घेण्यात यावे ज्यावेळेस त्यांचेवर गुन्हा सिध्द होईल तेंव्हा त्यांचेवर कार्यवाही करावी

श्री.अ.रशीद खान :निलंबीत कर्मचाऱ्याना ६ महिण्याच्या आत कामावर घेता येत नाही. येत्या ३१ तारखेला त्यांना सहा महिने होतील. एक तारखेला त्यांना कामावर घेण्यात यावे.

सौ.लता दलाल :६ महिण्यापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे त्यांना कामावर घेण्यात यावे.

मा.आयुक्त :मागिल महिण्यात चार कर्मचाऱ्याना पून्हा कामावर घेण्यात आलेले आहे. त्यात मालमत्ता अधिकारी तसेच दोन इमारत निरीक्षक होते. व श्री. शेख नावाचे एक कर्मचारी होते. अनधिकृत बांधकाम होवून ती भिंत कोसळून एक महिलेचा मृत्यू झालेला होता. या घटना स्थळी मा.महापौर यांनी भेट दिली होती. दोन कर्मचाऱ्यानी त्या कामात कसूर केल्यामूळे त्यांना निलंबीत केलेले होते. परत ७-८ दिवसानंतर कामावर घेतलेले आहे. तसेच श्री. शेख व श्री. रामटेके यांना बाजारच्या संदर्भात निलंबीत करण्यात आले होते. धनादेश वटवले गेले नव्हते. त्यांनी काहीही दखल घेतली नाही म्हणून निलंबीत केलेले होते. ज्या ठेकेदाराने चेक दिले होते ते बॉन्स झाल्यामूळे त्यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.व दोन कर्मचाऱ्याची चौकशी सुरू केली प्रशासकीय कारणास्तव त्यांना परत कामावर घेतलेले आहे. जे ९ अभियंता यांना कामावर घेण्याबाबत प्रश्न उपस्थित केला. कामावर घेतलेले कर्मचारी व या ९ कर्मचाऱ्यामधे फरक असा की या ९ लोकांच्या विरूध्द क्रिमीनल केसेस दाखल आहेत. या संदर्भात स्थायी समितीमधे चर्चा झालेली आहे. असे एकूण १९ कर्मचारी शासन सेवेत होते. त्या कर्मचाऱ्यावर काय कार्यवाही केलेली आहे माहिती घेत आहोत. कोणतीही परीक्षा पास न होता पैसे देवून प्रमाणपत्र सादर करीत असेल तर योग्य नाही म्हणून त्यांचेवर गुन्हे दाखल केलेले आहे. शासन सेवेतील इतर अभियंत्याच्या बाबतीत माहिती घेवून निर्णय घेता येईल.

सौ. लता दलाल :मालमत्ता विभागाचे अधिकारी यांना कामावर घेतले परंतू लेखा परीक्षणाचा अहवाल मागविलेला होता तो आलेला आहे का त्यांना कामावर कोणत्या बेसवर घेतलेले आहे.

मा.महापौर :लेखा परीक्षण चालू आहे. तसे मुख्य लेखा परीक्षक यांना आदेशीत केलेले होते. सकाळीच एक गोपनीय पत्र माझ्याकडे आलेले आहे.संपूर्ण माहिती पुढील बैठकीत ठेवण्यात येईल. ९निलंबीत अभियंते तसेच दुय्यम अवेक्षक यांना काम न करता पगार देण्यात येतो.कामासाठी तांत्रिक कर्मचाऱ्याची गरज आहे. जेंव्हा न्यायालयाचा निर्णय होईल त्यावेळेस नियमाप्रमाणे कार्यवाही प्रशासनाने करावी लवकरात लवकर चौकशी करून त्यांना कामावर रूजू करून घ्यावे

श्री.कटकटे सतीश . :मालमत्ता अधिकारी यांना कामावर रूजू करून घेतले . बाजाराची जी वसूली होती ती वसूली झालेली आहे का?

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : ज्या कारणामूळे निलंबीत केले होते. ती वसूली झालेली आहे का याचा खुलासा करावा.

उपआयुक्त (म), :जाफरगेट बाजार प्रकरणात तत्कालीन मालमत्ता अधिकारी श्री. रामटेके यांना निलंबीत करण्यात आले होते,जे ठेकेदाराने दोन धनादेश दिले होते एक ४.८१ लक्षचा तसेच दुसरा ३.६० लक्षचा या प्रकरणी त्यांना निलंबीत करण्यात आलेले होते. संबधीत ठेकेदाराने वरील पैकी ३.६० लक्ष एवढी रक्कम संबधीत ठेकेदाराने महानगरपालिकेला रोख भरणा केलेली आहे उर्वरीत ४.८१ लक्षच्या थकबाकी विषयी आणी जो धनादेश बॉन्स झाला त्या विषयी प्रशासनाने दिं १५ सप्टेंबर रोजी निगोसिएशन ॲक्ट च्या कलम १३८ नुसार गुन्हा दाखल केलेला असून तसेच महानगरपालिकेची फसवणूक केल्याबध्दल भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेले आहे. या सर्व प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतरच मालमत्ता अधिकारी व सध्याचे वार्ड अभियंता श्री. रामटेके व मालमत्ता निरीक्षक श्री. उस्मान यांना कामावर परत घेण्यात आलेले आहे.

**विषय क्र. ७२/१ :**

दिनांक १८.०८.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :मागिल बैठकीत जे निर्णय होतात त्या विषयी काय कार्यवाही करण्यात आलेली आहे या संबधीचा विषय क्र २ असावा असे मी म्हटले होते. परंतू तशी माहिती देण्यात आलेली नाही.

मा. महापौर : मागिल बैठकीत या संबधी रूलींग दिलेले आहे. आजच्या बैठकीची माहितीचा पूढील बैठकीत मा.आयुक्त अहवाल ठेवतील.इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक १८.०८.२००५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र. ७३/२ :**

सर्वसाधारण सभा दि.०७.१०.२००५ चे ठराव क्र.६२/३ प्रमाणे.

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील वर्ग-४ संवर्गातील खालील दर्शविलेल्या प्रमाणे शिल्लक अनुशेष भरून काढण्यासाठी सेवा योजन कार्यालय व जाहिरात देवून दि.२७.०६.२००३ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते.

| अ.क्र. | पदाचे नांव | अनुशेषानुसार रिक्त पदाची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु.जमाती | विजा (अ) | भज (ब) | इमाव | एकूण |
| ०१. | इले.पंप चालक | – | ०१ | – | – | ०१ |
| ०२. | लाईनमन (पापु) | ०१ | ०१ | ०१ | – | ०३ |
| ०३. | लाईनमन (विद्युत) | ०१ | – | – | ०१ | ०२ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०४. | सुरक्षा रक्षक | ०१ | ०१ | – | – | ०२ |
| ०५. | माळी | ०५ | – | – | – | ०५ |
| ०६. | शिपाई | – | ०५ | ०१ | – | ०६ |
| | **एकूण** | **०८** | **०८** | **०२** | **०१** | **१९** |

वरील पदासाठी प्राप्त झालेल्या पत्र अर्जानुसार व सेवा योजन कार्यालयाकडील प्राप्त यादीतील उमेदवारांना दि.२८.०९.०३ रोजी लेखी मुलाखतीस बोलाविण्यात आले होते. परंतू प्रकरण मा.उच्च न्यायालयात न्याय प्रविष्ट झाले व मा.उच्च न्यायालयात दिनांक २६.०९.२००३ रोजी सुनावणी होवून वर्ग-४ संवर्गातील अनुशेष भरून काढण्यासाठी प्राप्त झालेल्या सर्व पात्र उमेदवारांना लेखी परिक्षेस बोलवावे व त्यातील गुणवत्तेनुसार व सेवा भरती नियमानुसार नेमणूकीची कार्यवाही करावी, असे निर्देश दिले होते. त्यामुळे दिनांक २८.०९.२००३ रोजीच्या लेखी परिक्षा रद्द करण्यात आल्या होत्या. सन २००४ मध्ये लोकसभा व विधान सभेच्या सार्वत्रिक निवडणूकीची व २००५ मध्ये महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीची आचार संहिता असल्यामूळे मुलाखती घेता आल्या नाहीत.

दिनांक ०६.०६.२००५ रोजी पात्र उमदवारांच्या लेखी परिक्षा घेण्यात आल्या व त्यानंतर दिनांक १२.०७.२००५ व १३.०७.२००५ रोजी तोंडी परिक्षा घेण्यात आल्या. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने खालील दर्शविलेल्या गुणानुक्रमे पात्र उमेदवारांची निवड यादी मान्यतेस्तव सादर.

| अ. क्र. | निवड केलेल्या उमेदवाराचे नांव (सर्वश्री) | पद | प्रवर्ग | प्राप्त केलेले एकूण गुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | कोलते रावसाहेब आनंदा | लाईनमन (पापु) | अनु.जमाती | ७६.७५ | |
| २. | अंबोरे मनोज मारोती | लाईनमन (विद्युत) | इमाव | ७६.५ | |
| ३. | सोनवणे विष्णु बाबुराव | लाईनमन (विद्युत) | इमाव | ७०.२५ | प्रतिक्षा यादी |
| ४. | पाडळे विजय सांडू | लाईनमन (विद्युत) | अनु.जमाती | ५७ | |
| ५. | पल्हाळ किशोर भिमराज | लाईनमन (विद्युत) | अनु.जमाती | ५४.५ | प्रतिक्षा यादी |
| ६. | चव्हाण बाळासाहेब बळीराम | सुरक्षा रक्षक | विजा-अ | ६१ | |
| ७. | पवार विष्णु मल्लू | इले.पंपचालक | विजा-अ | ६५.५ | |
| ८. | पवार वसंत जागाराम | इले.पंपचालक | विजा-अ | ५२ | प्रतिक्षा यादी |
| ९. | जाधव नंदकिशोर सखाराम | माळी | अनु.जमाती | ७३.५ | |
| १०. | ठाकरे देविदास रामराव | माळी | अनु.जमाती | ६९.७५ | |
| ११. | चव्हाण प्रविण भाऊसाहेब | माळी | अनु.जमाती | ६४.२५ | |
| १२. | मंजु करणसिंग चव्हाण | माळी | अनु.जमाती | ६३.७५ | |
| १३. | सुरले गणेश गोटूजी | माळी | अनु.जमाती | ६०.७५ | |
| १४. | गरूड भानुदास जगन्नाथ | माळी | अनु.जमाती | ६० | प्रतिक्षा यादी |
| १५. | बोरकर चांदुराव सखाराम | माळी | अनु.जमाती | ६० | प्रतिक्षा यादी |
| १६. | चव्हाण पुंडलिक खेरू | शिपाई | विजा-अ | ८०.५ | |
| १७. | जारवाल कपुरचंद फकिरचंद | शिपाई | विजा-अ | ८० | |
| १८. | जाधव राजु लिंगाजी | शिपाई | विजा-अ | ७७.२५ | |
| १९. | राठोड राजु सिताराम | शिपाई | विजा-अ | ७७.२५ | |
| २०. | राठोड संतोष मधुकर | शिपाई | विजा-अ | ७६.५ | |
| २१. | राठोड अशोक मन्साराम | शिपाई | विजा-अ | ७६ | प्रतिक्षा यादी |
| २२. | राठोड विजय मधुकर | शिपाई | विजा-अ | ७५.५ | प्रतिक्षा यादी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३. | परदेशी संजय फुलचंद | शिपाई | भज (ब) | ८३.७५ | |
| २४. | आहेरकर नितीन विठ्ठल | शिपाई | भज (ब) | ७६.५ | प्रतिक्षा यादी |

करिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये वर नमूद केलेल्या व निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या नांवा समोर दर्शविलेल्या पदावर नियुक्ती देण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संजय जगताप :विषय क्र २ मंजूर करण्यात येवू नये.

मा. महापौर :मागिल बैठकीत आपण आरोप केलेले होते. आपण काही पुरावे देणार होते म्हणून प्रस्ताव स्थगित ठेवलेला होता. पुरावे असतील सादर करावे.नामंजूर करण्या मागे कारण असावे.

श्री.संजय जगताप :मा.आयुक्तांनी स्वत मुखलाखती घ्याव्यात. हा ठराव रद्य करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :नामंजूर करता येत नाही अनुशेष भरती आहे. मा.आयुक्तांनी नियुक्ती केलेली आहे. मान्यता देण्यात यावी.

श्री.संजय जोशी :मंजूरी देण्यात यावी.

श्री.ताठे भाऊसाहेब :प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ :मंजूर करावा सभागृहाचे मत आहे.

मा.महापौर :मागिल वेळेस प्रशासनास सूचना केली होती की मार्कस् सहीत सादर करावा तसे प्रस्तावात आता नमूद आहे. विषय क्र २ मजूंर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये खालील प्रमाणे नमूद केलेल्या व निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या नांवा समोर दर्शविलेल्या पदावर नियुक्ती देण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | निवड केलेल्या उमेदवाराचे नांव (सर्वश्री) | पद | प्रवर्ग | प्राप्त केलेले एकूण गुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | कोलते रावसाहेब आनंदा | लाईनमन (पापु) | अनु.जमाती | ७६.७५ | |
| २. | अंबोरे मनोज मारोती | लाईनमन (विद्युत) | इमाव | ७६.५ | |
| ३. | सोनवणे विष्णु बाबुराव | लाईनमन (विद्युत) | इमाव | ७०.२५ | प्रतिक्षा यादी |
| ४. | पाडळे विजय सांडू | लाईनमन (विद्युत) | अनु.जमाती | ५७ | |
| ५. | पल्हाळ किशोर भिमराज | लाईनमन (विद्युत) | अनु.जमाती | ५४.५ | प्रतिक्षा यादी |
| ६. | चव्हाण बाळासाहेब बळीराम | सुरक्षा रक्षक | विजा-अ | ६१ | |
| ७. | पवार विष्णु मल्लू | इले.पंपचालक | विजा-अ | ६५.५ | |
| ८. | पवार वसंत जागाराम | इले.पंपचालक | विजा-अ | ५२ | प्रतिक्षा यादी |
| ९. | जाधव नंदकिशोर सखाराम | माळी | अनु.जमाती | ७३.५ | |
| १०. | ठाकरे देविदास रामराव | माळी | अनु.जमाती | ६९.७५ | |
| ११. | चव्हाण प्रविण भाऊसाहेब | माळी | अनु.जमाती | ६४.२५ | |
| १२. | मंजु करणसिंग चव्हाण | माळी | अनु.जमाती | ६३.७५ | |
| १३. | सुरले गणेश गोटूजी | माळी | अनु.जमाती | ६०.७५ | |
| १४. | गरूड भानुदास जगन्नाथ | माळी | अनु.जमाती | ६० | प्रतिक्षा यादी |
| १५. | बोरकर चांदुराव सखाराम | माळी | अनु.जमाती | ६० | प्रतिक्षा यादी |
| १६. | चव्हाण पुंडलिक खेरू | शिपाई | विजा-अ | ८०.५ | |
| १७. | जारवाल कपुरचंद फकिरचंद | शिपाई | विजा-अ | ८० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८. | जाधव राजु लिंगाजी | शिपाई | विजा-अ | ७७.२५ | |
| १९. | राठोड राजु सिताराम | शिपाई | विजा-अ | ७७.२५ | |
| २०. | राठोड संतोष मधुकर | शिपाई | विजा-अ | ७६.५ | |
| २१. | राठोड अशोक मन्साराम | शिपाई | विजा-अ | ७६ | प्रतिक्षा यादी |
| २२. | राठोड विजय मधुकर | शिपाई | विजा-अ | ७५.५ | प्रतिक्षा यादी |
| २३. | परदेशी संजय फुलचंद | शिपाई | भज (ब) | ८३.७५ | |
| २४. | आहेरकर नितीन विठ्ठल | शिपाई | भज (ब) | ७६.५ | प्रतिक्षा यादी |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४/३ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या गट 'क' व गट 'ड' मधील कर्मचाऱ्यांना सन २००४-२००५ या आर्थिक वर्षातील दिवाळी सणानिमित्ताने बोनस अदा करावा अशी विविध कामगार संघटनांची मागणी होती. दि.७.११.२००४ रोजी विविध कामगार संघटनेचे पदाधिकारी व महानगरपालिकेचे पदाधिकारी व अधिकारी यांच्यात संयुक्तरित्या बैठक संपन्न होवून महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणापूर्वी रू.४०००/- अग्रीम रक्कम अदा करून मा.उच्च न्यायालयात बोनस प्रकरणी प्रलंबीत याचिका क्र.४६६७/०२ चा निकाल मार्च २००५ पूर्वी न्यायालयाने दिल्यानंतर मा.सर्वसाधारण सभेसमोर रू.१५००/- वरील म्हणजे रू.२५००/- च्या अग्रीम रक्कमेबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचे ठरले होते. तदनुषंगाने दि.१२.०१.२००५ रोजी याचिका क्र.४६६७/०२ मधील वादी श्री.राहुल जोशी यांनी बोनस विरोधी दाखल केलेली याचिका परत घेतल्यामुळे मा.न्यायालयाने याचिका खारीज केलेली आहे. मा.सभागृहासमोर खालील बाबी प्रशासनातर्फे निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

१. महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सन २००५-२००६ या आर्थिक वर्षातील बोनस बाबत धोरण ठरवावे.

२. महानगरपालिका कर्मचाऱ्यांमध्ये काही अनुदानीत पदे जी शिक्षण विभाग, कुटूंब कल्याण विभाग, मलेरिया विभाग यांना बोनस अनुदान शासनाकडून प्राप्त होत नाही. त्यामुळे या पदांना बोनस द्यावयाचा झाल्यास महानगरपालिका तिजोरीवर रू.३० लाखाचा बोजा पडतो व शासनाकडून याचे अनुदान मिळत नाही.

३. महानगरपालिका कर्मचाऱ्यांना ३० दिवसाचा बोनस जाहिर करावयाचा झाल्यास एकुण रक्कम रू.१.१२ कोटी खर्च अपेक्षित आहे आणि २००५-२००६ या आर्थिक वर्षात रू.१.०० लक्ष अर्थसंकल्पिय तरतुद करण्यात आलेली असून रू.१.११ कोटी रक्कमेची वाढीव तरतुद सुधारित अंदाजपत्रकात करावी लागेल.

४. सन २००५-०६ या वर्षाच्या अंदाजपत्रकात महानगरपालिकेस देणे असलेली मार्च २००५ अखेरपर्यंतची रक्कम रू.३१३.१५ कोटी इतकी प्रलंबीत आहे.

शासन निर्णय क्र.जीईएन १०९७/प्र.क्र.२६७/९७/नवि-२४/ दि.१४ जुलै १९९८ नुसार महानगरपालिकेची कोणतीही देणी शिल्लक न ठेवता व महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेऊन निर्णय घेण्याचे आदेश आहेत, उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता मा.सर्वसाधारण सभेने महानगरपालिका कर्मचाऱ्यांना बोनस देणे बाबत धोरण ठरविणेस्तव प्रस्ताव सादर.

तसेच औरंगाबाद महानगरपालिका कर्मचाऱ्यांना अदा करण्यात येणारे वेतन व भत्ते शासकीय नियमाप्रमाणे अदा केली जातात. बोनस/सानुग्रह अनुदानाबाबत सुध्दा खालील धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

१. महाराष्ट्र शासन ज्या ज्या वर्षी शासकीय कर्मचाऱ्यांना जेवढ्या प्रमाणात बोनस/सानुग्रह अनुदान जाहीर करेल तेवढ्याच प्रमाणात औरंगाबाद महानगरपालिका कर्मचाऱ्यांना बोनस मंजुर करण्यात येईल.

२. महाराष्ट्र शासनाने ज्या वर्षी बोनस जाहिर केला त्या वर्षी शासकीय नियमाप्रमाणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सण अग्रीम मंजुर करण्यात येईल.

३. महाराष्ट्र शासनाने जर बोनस/सानुग्रह अनुदान शासकीय कर्मचाऱ्यांना मंजुर केले नाही, त्यावर्षी महानगरपालिका कर्मचाऱ्यांना बोनस ऐवजी रू.४०००/- सण अग्रीम मान्य करण्यांत येईल. मंजुर केलेल्या रू.४०००/- अग्रीम रक्कमेची परतफेड समान १० हप्त्यात संबंधीतांच्या वेतनातून वसूल करण्यांत येईल.

४. चालु आर्थिक वर्षाचा विचार सानुग्रह अनुदान देणे बाबत करावयाचा झाल्यास कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान ऐवजी रू.४०००/- अग्रीम देणे योग्य होईल.

उपरोक्त सर्व बाबीचा विचार करता महानगरपालिका कर्मचाऱ्यांना बोनस बाबतचे धोरण ठरविण्यास्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.मुजीब खान :बोनस देण्या बाबत सर्वांचीच भावना असते. परंतू वसूली किती झालेली आहे किती विकास कामे झालेली आहे. याचा खुलासा अगोदर करण्यात यावा.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.सलीम खान :दिवाळी साठी कर्मचाऱ्यांना बोनस देण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी : या प्रस्तावात चार बाबीची स्पष्टता दिलेली आहे. ती खालीलप्रमाणे.

१.महाराष्ट्र शासन ज्या ज्या वर्षी शासकीय कर्मचाऱ्यांना जेवढ्या प्रमाणात बोनस/सानुग्रह अनुदान जाहीर करेल तेवढ्याच प्रमाणात औरंगाबाद महानगरपालिका कर्मचाऱ्यांना बोनस मंजुर करण्यात येईल.

२.महाराष्ट्र शासनाने ज्या वर्षी बोनस जाहिर केला त्या वर्षी शासकीय नियमाप्रमाणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सण अग्रीम मंजुर करण्यात येईल.

३.महाराष्ट्र शासनाने जर बोनस/सानुग्रह अनुदान शासकीय कर्मचाऱ्यांना मंजुर केले नाही, त्यावर्षी महानगरपालिका कर्मचाऱ्यांना बोनस ऐवजी रू.४०००/- सण अग्रीम मान्य करण्यांत येईल. मंजुर केलेल्या रू.४०००/- अग्रीम रक्कमेची परतफेड समान १० हप्त्यात संबंधीतांच्या वेतनातून वसूल करण्यांत येईल.

४.चालु आर्थिक वर्षाचा विचार सानुग्रह अनुदान देणे बाबत करावयाचा झाल्यास कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान ऐवजी रू.४०००/- अग्रीम देणे योग्य होईल.

श्री.संजय सिरसाट :४०००/- रूपये ॲग्रीम देण्याचा अधिकार या सभागृहाचा असतांना देखील प्रशासनाने देण्यात येईल असे नमूद केलेले आहे..कोणत्या अधारे सर्वसाधारण सभा देणार की प्रशासन.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:बोनस दयायचेच असेल तर प्रस्ताव कशासाठी सादर केला.

मुख्यलेखाधिकारी :बोनस दयावे म्हणून कोठेही नमूद नाही शासनाने नियम महानगरपालिकेस लागू आहे पाचवा वेतन आयोग असेल किंवा महागाई भत्त वाढ झाली असेल त्या प्रमाणे कर्मचाऱ्याना लागू केलेली आहे. शासनाने बोनस मान्य केले तर बोनस देण्याची शिफारस सर्वसाधारण सभेसमोर करण्यात येईल.तो सभागृहाचा अधिकार आहे.

गत वर्षी बोनस देण्यात आलेला नव्हता म्हणून पॉलीसी ठरविण्यात आली होती की १५०० रूपये ऐवजी ४००० हजार रूपये ॲग्रीम देण्यात यावे .त्यामूळे नमूद केलेले आहे.

श्री.संजय सिरसाट :तशी रक्कम नमूद करण्याचा अधिकार प्रशासनास नाही सभागृहाचा अधिकार आहे किती ॲग्रीम दयायची.देण्यात येईल असे दिले. चूकीने नमूद केले दुरूस्ती करावी.

मा.आयुक्त :प्रस्ताव असा आहे की या बाबत धोरण निश्चित करणे आवश्यक आहे सभागृहाने मान्यता दिल्यानंतरच कार्यवाही होईल आपला अधिकार आहे शासनाचे सर्व नियम महानगरपालिकेस लागू आहे शासनाने बोनस दिला तर देवू नाही दिला तर मागिल वर्षी प्रमाणे अॅग्रीम देवू असे नमूद केलेले आहे.

श्रीमती अलका पाटील :कर्मचाऱ्याना चार वर्षापासून बोनस दिला जात नाही या वर्षी वसूली चांगली आहे. प्रशासनाचे अभिनंदन करते. बोनस देण्यात यावा.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ :दिवाळीसाठी बोनस देता येईल या दृष्टीने चर्चा करावी. प्रशासनाने ठेवलेला प्रस्ताव योग्य आहे. ४००० रूपये अॅग्रीम देण्याचा प्रस्ताव आहे. मान्य करावा.

श्रीमती अलका पाटील :किमान १०००/-रूपये दिवाळी भेट म्हणून देण्यात यावी.

श्री.मुजीब खान :माझ्या प्रश्नाचा खूलासा करण्यात यावा.वसूली किती झालेली आहे. सहा महिण्यापासून वार्डात विकास कामे होत नाही.७० कोटी विकास कामासाठी आहे केंव्हा खर्च करणार आहे.

मुख्यलेखाधिकारी :आर्थिक परीस्थितीचा विचार करता १ एप्रिल २००५ ते १३ ऑक्टोबर २००५ पर्यत अनुदान सहीत वसुली ही ६१.११ कोटी झालेली असून खर्च हा ५८कोटी झालेला आहे. जकातीची वसुली ही ३९.७६ कोटी आहे. मालमत्ता कर हा ४.७६ कोटी , नगररचना विभागाची वसुली २.६१ कोटी तर आरोग्य विभाग २२ हजार प्राणी संग्रहालय १७ हजार उदयान २२ हजार मालमत्ता विभाग ६४ हजार पाणी पट्टी ४.३३ कोटी , पाणी पट्टी जायकवाडी १.२६ कोटी, अनुदान ३.६८ कोटी आणि इतर ३.६२ कोटी झालेली आहे. ,एकूण वसूली ही ६१.११ कोटी झालेली आहे.

श्री.माळवतकर महेश :९८ वार्डात विकास कामावर जनतेसाठी किती खर्च झालेला आहे याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.मुजीब खान :५८ कोटी खर्च झाले असे म्हटले विकास कामावर किती व कोणत्या भागात विकास कामे झालेली आहे माहिती देण्यात यावी.

श्री.संजय जगताप :कामगारांना बोनस मिळाला पाहिजे. सर्व आघाडीच्या स.सभासंदाची सम्मती आहे. मानधन देण्याची तयारी आहे.

मुख्य लेखाधिकारी :वेतन व भत्ते यावर २७.७० कोटी, ठेकेदाराची बिले ८.१५ कोटी, विद्युतसाठी १२.१४ कोटी,भुसंपादनासाठी २०.७८ लक्ष, यांत्रिकी डिझेल व देखभाल दुरूस्तीसाठी १.३९ कोटी, स्वेच्छा निधी १२ लक्ष, इतर देयके १०.६० कोटी असे एकूण ५८ कोटी खर्च झालेले आहे.आणि स्थायी समितीने निर्देश दिले की येणारा पगार हा जकात व्यतिरिक्त इतर वसुलीतून करावा त्यानुसार १ ते १३ ऑक्टोबर २००५ पर्यत वसुली ही त्यामधे जकात ३.३७ कोटी, मालमत्ता कर ७० लक्ष, नगररचना ३४ लक्ष,आरोग्य ८७ हजार,प्रांणी संग्रहालय ८२ हजार उदयान विभाग १.०२ लक्ष, मालमत्ता विभाग २.४६ लक्ष, पाणी पट्टी शहर ४८.४० लक्ष,अनुदान ६६ लक्ष आणि इतर ४५.लक्ष असे १ ते १३ ऑक्टोबर पर्यंत ६.०७ कोटी वसूल झालेले असून रूपये ४.६३ कोटी खर्च झालेला आहे.

श्री.मनमोहनसींग ओबेराय:अॅग्रीमसाठी २ कोटी वाटप करावे लागते बोनस दिले तर २४०० रूपये दिल्या जाते. त्यासाठी १.११ कोटीची तरतूद करायची आहे. असे असेल तर बोनस दिले पाहिजे. वर्ग ४ च्या कर्मचाऱ्याना कशाचाही अधार नाही. वर्षभर ते सफाई करतात. शहर स्वच्छ ठेवतात.बोनस दिला पाहिजे. ६१ कोटीची वसूली झालेली आहे. १.११ कोटी म्हणजे १.५टक्के वसुली होणे आवश्यक आहे चार महिनेआणखी

वसुलीसाठी आहे. वसुली जास्तीत जास्त करण्यात यावी. व कर्मचाऱ्याना बोनस देण्यात यावा अशी मागणी आहे.

श्री.सलीम खान : बोनस देण्यात यावा.

श्री.संजय रिडलॉन :सफाई मजूर कर्मचारी वर्षभर शहराची साफसफाई करतात. ॲग्रीम दिल्यानंतर ते कपात केले जाते. त्यांना काहीही मिळत नाही. त्यासाठी सर्व कर्मचाऱ्याना बोनस दिला पाहिजे. दिवाळीसाठी बोनस मिळावा म्हणून त्यांची अपेक्षा असेल.

श्रीमती अलका पाटील :सफाई कामगार हे शहर स्वच्छ ठेवतात. दिवाळी सण हा मोठा आहे. या कर्मचाऱ्याना पगार कमी असतो त्यात कपात जास्त असते.त्यांना २००० ते २५०० पर्यतच पगार मिळातो. ४००० ॲग्रीम दिले तर ४०० रूपये प्रमाणे कपात होत असते. बोनसच्या रूपाने ४०००/- देण्यात यावे.

श्री.मिलींद दाभाडे :गेटच्या बाहेर कामगार हे सिध्दार्थ दाभाडे यांचे नेतृत्वाखाली धरणे देत आहे. बोनस देत असतांना बाहेरील कोणत्या व्यक्तीला बोनसचे श्रेय न जाता जे कामगाराचे नेतृत्व करतात. अशांना आपल्या दालनात बोलवून व पदाधिकारी व जेष्ठ सदस्य यांचेशी चर्चा करून महानगरपालिकेला शक्य होईल तितके बोनस देण्या बाबत निर्णय घेण्यात यावा.

श्री.गायकवाड कैलास :गेल्या ५ वर्षापासून कर्मचाऱ्याना बोनस दिले जात नाही. ५ हजार बोनस देण्यास मंजूरी देण्यात यावी.

श्री.गायकवाड दिलीप :बोनस देण्या बाबत मंजूरी देण्यात यावी. व जे कुणी कामगार नेते असतील त्यांना यातून आर्थिक फायदा होवू नये.अशा पध्दतीने निर्णय घेणयात यावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : बोनस कर्मचाऱ्याना दिल्यानंतर कुण्याही संघटनेच्या नेत्यांनी त्याचेकडून वसूली करू नये याची दक्षता घेण्यात यावी.

श्री.हिम्म्तराव दाभाडे :वर्ग ४ चे कर्मचारी हे शहर स्वच्छ ठेवतात. सर्व पदाधिकारी व जेष्ठ सदस्य यांनी एक बैठक घ्यावी त्यात बोनस देण्या बाबत निर्णय घेण्यात यावा.

श्री.कचरू मोरे :सफाई कामगार हे सकाळी ५ वाजेपासून शहर स्वच्छ ठेवण्याचे काम करतात. पूर्वी ८ झोन होते आता ६ वार्ड करण्यात आलेले आहे. महानगरपालिकेची आर्थिक परीस्थिती सुधारलेली आहे. पूणे, नाशिक, पिपंरी चिचंवड महानगरपालिकेत कर्मचाऱ्याना किमान ९००० रूपये पगार मिळतो, येथील कर्मचाऱ्याना फक्त ५०००रूपया पर्यत पगार मिळतो. ९००० रूपये पगार असता तर बोनसची मागणी केली नसती. बोनस रूपाने सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात यावा. ज्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत काही कर्मचाऱ्याना ८ ते १० कि.मीटर पर्यत सफाईसाठी जावे लागते अशी परीस्थिती आहे. त्यात त्यांचा पैसा खर्च होतो.

श्री.अ.रशिद खान :महानगरपालिकेची आर्थिक परीस्थिती बघून बोनस देण्याचा विचार करावा लागेल.वसूली ही वर्ग ४ चे कर्मचारी करणार नाही. वर्ग ३ चे कर्मचारी करणार आहे. हे दोन्ही मूद्ये वेगळे करावे. वर्ग ४ चे कर्मचारी शहर स्वच्छ ठेवतात घाणीमधे काम करतात ही सहानुभूती वेगळी होवू शकते. सफाईसाठी मजूर कर्मचारी कमी आहे. स्वच्छता होत नाही कर्मचारी काम करीत नाही असे आपण समजतो.सफाईचे काम होत आहे. परंतू शहर मोठे झालेले आहे. कर्मचारी कमी आहे. त्यामूळे काही ठिकाणी स्वच्छता होत नाही. काहीना काही तरी बोनस देण्यात यावा..वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचाऱ्याना बोनस देण्यात यावे.आज जाहीर करावे. कमेटी नियुक्त करावी. किती दयायचे योग्यतो निर्णय घेण्यात यावा.धनादेशद्धारे बोनस देण्यात यावा.

श्री.मुजीब खान :बोनस देण्याच्या वेळी बाहेरील काही लोक कर्मचाऱ्याकडून पैसे वसूल करतात तसा प्रकार होवू नये. बाहेरील कोणत्याही व्यक्तीवर जबाबदारी टाकण्यात येवे नये. मा.महापौरांनी जबाबदारी घ्यावी कर्मचाऱ्याना सुरक्षित पैसे कसे मिळत याची दखल घ्यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:बोनस देणार असेल तर किती दयायचा त्या बाबतीत निर्णय घेण्यात यावा.

सौ.लता दलाल :सर्व पदाधिकारी व आपण बसून योग्य तो निर्णय घ्यावा. आपणास अधिकार देण्यात येत आहे. असा ठराव मंजूर करण्यात यावा.

श्री.तरवेद्रसिंग धिल्लन :कर्मचाऱ्याना बोनस दिलाच पाहिजे. कमेटी नियुक्त करावी. पदाधिकारी अधिकारी यांनी एकत्रित बसून योग्य निर्णय घेण्यात यावा.

श्री.सय्यद खुसरो :बोनस देण्यात यावे परंतू त्याचे श्रेय सभागृहाला मिळावे. बाहेरील व्यक्तीला मिळू नये.

मा.आयुक्त :बोनस देण्याचा अधिकार संपूर्ण सभागृहाला आहे. परंतू बोनस साठी एक लक्षची तरतूद केलेली आहे. बोनस देण्याचा निर्णय झाला तर कोणतेतरी कामे कमी करून १.१०कोटीची तरतूद करावी लागेल. जो ठराव होईल त्यात तसा ठराव सुध्दा मंजूर करावा लागेल. सभागृहाला हे पण अधिकार आहे की किती दिवसाचे बोनस दयायचे.बोनसचा प्रश्न प्रत्येक वर्षी निघेल त्यासाठी एक धोरण ठरविणे योग्य होईल. बोनस देण्या संबधी प्रशासनाचे परफारमन्स वर ठेवावे योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

श्री.अजीज जहागीरदार : महानगरपालिकेचे १.३० कोटी रूपये वाचले चोरांना वाटप न करता गरीबांना वाटप करावे बोनस देण्यात यावे.

श्री.संजय जोशी :मा.महापौर व सर्व पदाधिकारी यांनी एकत्रिक बसून निर्णय घेण्यात यावा.

श्री.नरवडे वसंत : निर्णय घेतांना सर्व पक्षाचे नगरसेवकांना बोलविण्यात यावे. बोनस दयायचे की ॲग्रीम दयायचे हा निर्णय घेण्यात यावा.कामगार शहर स्वच्छ करतात. कामगार कमी असल्यामूळे काही ठिकाणी स्वच्छता राहत असेल तो भाग वेगळा आहे. परंतु बोनस देणे गरजेचे आहे. बोनस दयायचा आहे असा निर्णय घ्यावा किती दयायचा हे पदाधिकारी यांनी एकत्रित बसून योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.संजय सिरसाट :सर्वांनी आपआपले मत मांडलेले आहे. त्यास विरोध करणेचे कारणच नाही. परंतु ही चर्चा होत असतांना बोनस देता येईल किंवा नाही यावर प्रशासन आपसात चर्चा करीत होते. सर्वाच्या वतीने विनंती करतो की,आम्ही सर्व सदस्य आपणांस अधिकार देत आहोत.पदाधिकारी व जेष्ठ सदस्यांचे मत घ्यावे आमच्या सर्वांच्या मताचा आपण अनादर करणार नाही. चांगला निर्णय घ्याल अशी अपेक्षा व्यक्त करतो.दिवाळी जवळ आलेली आहे आपण दोन दिवसातच योग्य तो निर्णय घ्यावा.

मा.महापौर :या सभागृहाने सर्व पदाधिकारी व सदस्यांनी माझ्यावर जो विश्वास टाकला त्या बध्दल सर्वाचा आभारी आहे. कर्मचाऱ्याची दिवाळी चांगली कशी साजरी होईल व महानगरपालिकेकडे बजेट बघून सर्व पदाधिकारी बसून योग्य तो निर्णय घेवून कामगारांना न्याय देवू. फुल ना फुलाची पाकळी म्हणून बोनस देण्यात येईल. असे जाहीर करतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस देणेसाठी निर्णय घेण्याकरीता मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली स.पदाधिकारी यांची समिती स्थापन करण्यास व या समितीस याबाबत निर्णयघेण्याचे सर्वाधिकार देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय क्र. ७५/४ :**

सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करित आहेत की, मो. रेल्वेस्टेशन रोड येथील नगर भुमापन क्रमांक १९१४९ क्षेत्र ११०७७.४० ही मिळकत औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीची असून सदरील मिळकत मंजूर विकास योजने नुसार सार्वजनिक/निमसार्वजनिक वापरासाठी दर्शविलेली आहे. सदरील मिळकतीमध्ये अंदाजे २६००.०० चौ.मी. क्षेत्र हे मा.महापौर यांच्या बंगल्याने व्यापले आहे व १२.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र अंदाजे ५८८.५० चौ.मी. आहे. नगर भूमापन कार्यालयाच्या आखिव पत्रिकेनुसार या मिळकती पैकी ३५.७८ चौ.मी. क्षेत्र हे दोन खाजगी व्यक्तींना हस्तांतरीत केले आहे. उर्वरीत क्षेत्र अंदाजे ७८५३.१२ चौ.मी. हे बांधा,वापरा व हस्तांतरीत करा पध्दतीने विकसित करावयाचे प्रस्तावित असल्यामुळे विद्यमान सार्वजनिक/निमसार्वजनिक वापराचे क्षेत्राचा वापर बदलून हा वापर वाणिज्य उपयोगी करणे आवश्यक आहे.

निव्वळ वापरासाठी उपलब्ध होवू शकणारे अंदाजे क्षेत्र ७८५३.१२ चौ.मी. हे सार्वजनिक/निमसार्वजनिक वापरातून वगळून त्याचा समावेश वाणिज्य वापर क्षेत्रात करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे तरी वरील प्रमाणे अधिनियमाच्या तरतुदी नुसार शासन मंजुर विकास योजनेत फेरबदल करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर. प्रस्तावाच्या मान्यतेनंतर अधिसूचना प्रसिध्द करणे, हरकती व सूचना मागवून तद्नंतर अंतिम प्रस्ताव शासनास सादर करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना देण्यांत यावेत, प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**संवाद :**

श्री.जागीरदार अजीज :खाजगी दोन व्यक्ती कोण हस्तांतरण करण्याचे कारण काय खुलासा करण्यात यावा.

श्री.कोकाटे काशिनाथ :प्रस्ताव रिर्झवेशन संदर्भात ३७(१)च्या कार्यवाहीसाठी ठेवलेला आहे माझ्या माहिती प्रमाणे सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्याची आवश्यकता नाही या बाबत खुलासा घ्यावा.

सहा.संचालक (न.र) :या प्रकरणामध्ये पब्लीक सेमी पब्लीक वापर विकास योजनेमधे दर्शविण्यात आलेला आहे जर प्रशासकीय इमारत बांधायची असेल तर ३७(१)ची कार्यवाही करण्याची गरज नाही.

श्री.संतोष खेंडके :बीओटी संदर्भातील प्रस्ताव शहर सुधार समिती मार्फत येतात हा प्रस्ताव का आलेला नाही.

मा.महापौर :या संदर्भात मागिल बैठकीत बीओटी संदर्भात एक कमेटी स्थापन केलेली होती त्या कमेटीची बैठक झाली त्या बैठकीमध्ये बीओटीच्या बाबतीतले प्रस्ताव डायरेक्ट या सभागृहासमोर ठेवण्याचा निर्णय झाला व उर्वरीत जे ही प्रस्ताव असतील ते शहर सुधार समिती मार्फतच येतील.

श्री.वसंत नरवडे :दोन खाजगी व्यक्ती कोण आहे नावे का नमूद करण्यात आलेली नाही.

मा.महापौर :प्रस्ताव रद्य करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

## स.सदस्यांचे प्रस्ताव

**विषय क्र. ७६/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरातील नागरीकांना जन्ममृत्यु प्रमाणपत्रासाठी नोंदणी करण्याकरीता मुख्य कार्यालय टाऊन हॉल येथे चिकलठाणा,हर्सूल इत्यादी अशा लांब अंतरावरून यावे लागत असल्यामूळे नागरीकांना त्याचा त्रास होतो व त्यांचा वेळही वाया जातो. नागरीकांच्या सोयीच्या

दृष्टीकोनातून तसेच हर्सूल, सिडको-हडको, मुकूंदवाडी,चिकलठाणा या परिसरातील नागरीकांसाठी सिडको एन-७ प्रभाग समिती ''ब'' च्या कार्यालयात स्मशान परवाना नोंदणी विभाग सुरू करणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.भगवान घडमोडे, श्री.काशिनाथ कोकाटे अनुमोदक :- श्री.संजय शिरसाट

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील नागरीकांना जन्ममृत्यु प्रमाणपत्रासाठी नोंदणी करण्याकरीता नागरीकांच्या सोयीच्या दृष्टीकोनातून हर्सूल, सिडको-हडको, मुकूंदवाडी, चिकलठाणा या परिसरातील नागरीकांसाठी सिडको एन-७ प्रभाग समिती ''ब'' च्या कार्यालयात स्मशान परवाना नोंदणी विभाग सुरू करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र२८ मधील औरंगाबाद टाईम्स कॉलनी आणि एस.टी.कॉलनी या मंजूर रेखाकंनात ड्रेनेजचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या अस्तीत्वात असलेली जलनि:स्सारण वाहीनी कमी व्यासाची असल्याने वारंवार चोकप होत आहे. तसेच नेहरूनगरमधील कित्येक ठिकाणी ड्रेनेजचा त्रास वाढलेला आहे. अर्थसंकल्पात यासाठी पुरेशी तरतुद करण्यात आलेली नाही. करीता सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पातील ''मेन सिव्हर लाईन'' या शिर्षाखालील पृष्ठ क्र.१८६ वरील अ.क्र.४ चे काम स्थगीत करून त्याऐवजी औरंगाबाद टाईम्स कॉलनी व एस.टी.कॉलनी भागात बारा इंची ड्रेनेज लाईन (S.W.G.) टाकण्यासाठी रक्कम रू.४,००,०००/- चार लक्ष रू. आणि नेहरूनगर प्रभागातील विविध ठिकाणांची ड्रेनेज लाईन दुरुस्ती व देखभालसाठी र.रू.४,००,०००/-चार लक्ष रू. ची तरतूद करणे आवश्यक आहे.करीता मंजूरीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर

सुचक : श्रीमती मेहरून्निसा हमीद खान अनुमोदक : श्री.किशोर तुलशीबागवाले

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पातील ''मेन सिव्हर लाईन'' या शिर्षाखालील पृष्ठ क्र.१८६ वरील अ.क्र.४ चे काम स्थगीत करून त्याऐवजी औरंगाबाद टाईम्स कॉलनी व एस.टी.कॉलनी भागात बारा इंची ड्रेनेज लाईन (S.W.G.) टाकण्यासाठी रक्कम रू.४,००,०००/- चार लक्ष रू. आणि नेहरूनगर प्रभागातील विविध ठिकाणांची ड्रेनेज लाईन दुरूस्ती व देखभालीसाठी रक्कम रू.४,००,०००/- चार लक्ष रू. ची तरतूदीबाबत लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मनपातील वर्ग-२ व वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांची बदल्या महाराष्ट्रातील इतरत्र महानगरपालिकेत बदल्या करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुर करून शिफारससह प्रस्ताव महाराष्ट्र शासनास पाठविण्यात यावे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अजिज जागीरदार अनुमोदक : श्री.नासेर नाहदी

**संवाद :**

श्री.देसरडा प्रशांत : ठराव पास झाल्यानंतर अमलबजावणी केव्हा होणार आहे.

सौ.लता दलाल : सदस्यांचा प्रस्ताव असेल तर प्रशासन खुलासा करू शकत नाही का ?

मा.आयुक्त : हा प्रस्ताव अशासकीय आहे म्हणून खुलासा केलेला नाही मंजूर झाल्यानंतर शासनाकडे पाठविण्यात येईल.

श्री.त्रिबंक तुपे : मंजूर दयावी. शासनाकडे पाठण्यात यावे.

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेतील वर्ग-२ व वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांच्या बदल्या महाराष्ट्रातील इतरत्र महानगरपालिकेत करण्यास व प्रस्ताव महाराष्ट्र शासनास पाठविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.२९ गणेश कॉलनी या प्रभागातील विविध ठिकाणी गटारी करणे साठी अर्थसंकल्पाच्या पुस्तकातील पान क्रं.१८५,अ.क्र.१८ वर असलेले लेखा शिर्ष बदलून त्याऐवजी सदरील प्रभागात कॉंक्रीटींग व कॉक्रींट ब्लॉक करणे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.जावेद कुरैशी अनुमोदक : श्री.संजय जगताप, श्री.सय्यद खुसरो

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२९ गणेश कॉलनी या प्रभागातील विविध ठिकाणी गटारी करणे साठी अर्थसंकल्पाच्या पुस्तकातील पान क्रं.१८५,अ.क्र.१८ वर असलेले लेखा शिर्ष बदलून त्याऐवजी सदरील प्रभागात कॉंक्रीटींग व कॉक्रींटब्लॉक करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८०/९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, भारताचे माजी पंतप्रधान व राष्ट्रीय नेते स्व.श्री.राजीव गांधी यांचा पुर्णाकृती पुतळा, सिल्लेखाना चौक येथे उभारणे बाबत सर्वसाधारण ठराव क्र.६४/१३, दिनांक २०.१०.९२ अन्वये ठराव घेण्यात आला होता, तथापी सिल्लेखाना चौकाचे पूर्णत: रूंदीकरण झालेले नसल्याने पुतळा उभारणेसाठी जागा उपलब्ध झाली नाही. तसेच शासनाचे धोरणानुसार कोणत्याही चौकाचे मध्यभागी पुतळा उभारणी करता येत नसल्याने सदरील काम पूर्ण होवू शकले नाही. आता सदरील पुतळा सिल्लेखाना चौकात न बसविता दिल्लीगेट परिसरात रस्त्यालगत असलेल्या मनपा नेहरू उद्यानामध्ये जागा उपलब्ध करून देवून उभारण्यात यावा. तसेच या कामासाठी अर्थसंकल्प २००५-२००६ मध्ये १०.०० लक्ष रूपयाची तरतूद ठेवण्यात आलेली आहे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.तरविंदरसिंग धिल्लन अनुमोदक : श्री.मिलींद दाभाडे, श्री.नासेर चाऊस

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भारताचे माजी पंतप्रधान व राष्ट्रीय नेते स्व.श्री.राजीव गांधी यांचा पुर्णाकृती पुतळा सिल्लेखाना चौकात न बसविता दिल्लीगेटपरिसरात रस्त्यालगत असलेल्या महापालिका नेहरू उद्यानामध्ये जागा उपलब्ध करून देवून उभारण्यास तसेच या कामासाठी अर्थसंकल्प २००५-२००६ मध्ये र.रू.१०.०० लक्ष रूपयाची तरतूद ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१/१० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद मनपातर्फे प्रत्येक वर्षी महापौर चषक क्रिडा स्पर्धा घेण्यात येतात. या क्रिडा स्पर्धेत ''तायक्वॉडो'' स्पर्धेचा समावेश करून महापौर चषक तायक्वॉडो स्पर्धा घेण्यात याव्या. क्रिडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य यांचे तर्फे राष्ट्रीय पदक विजेत्या तायक्वॉडो खेळाडूस शिष्यवृत्ती देवून सन्मानित करण्यात येते. तर महाराष्ट्र शासनातर्फे या खेळातील सर्वोत्कृष्ट खेळाडूस शिव छत्रपती पुरस्कार देण्यात येतो. अशा या आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त खेळाचा महापौर चषक स्पर्धेत समावेश करणे व यावर्षी तायक्वॉडो चषक महापौर स्पर्धा घेणे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : १.श्री.संजय शिरसाट, २.श्री.संजय केनेकर

अनुमोदक : १.श्री.भगवान घडमोडे,२.श्री.तरविंदरसिंग धिल्लन

मा.महापौर : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे प्रत्येक वर्षी घेणाऱ्या महापौर चषक क्रिडा स्पर्धामध्ये''तायक्वॉंडो'' स्पर्धेचा समावेश करून महापौर चषक तायक्वॉंडो स्पर्धा घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२/११ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझ्या प्रभागातील रणजीतनगर येथील हॉटेल अमरप्रीत शहानुरमियॉ दर्गा रोड वरील चौकाला ''श्रीराम चौक'' हे नांव देण्यात यावे, करीता सर्वसाधारण सभेत ठराव मंजूरीसाठी ठेवण्यांत यावा.

सुचक : १. श्री.मधुकर सावंत, २.श्री.रेणुकादास वैद्य अनुमोदक : श्री.संजु रिडलॉन, सौ.अल्पा जैन

श्री.अ.रशीद खान : शहानुरमिया दर्गा रोड सोडून नाव देण्यात यावे.

मा.महापौर : दुरूस्तीसह मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभागातील रणजीतनगर येथील हॉटेल अमरप्रीत शहानुरमियॉ दर्गा रोड वरील चौकाला शहानुरमियॉं दर्गा रोड सोडून ''श्रीराम चौक'' हे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८३/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,प्रत्येक वर्षी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे महापौर चषक विविध स्पर्धा घेण्यात येतात, यात महापौर चषक ज्युदो स्पर्धेचा देखिल समावेश असतो.

त्याप्रमाणे यावर्षी देखिल औरंगाबाद महापालिकेतर्फे महापौर चषक ज्युदो स्पर्धा घेण्यात यावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.भगवान घडमोडे, डॉ.आशा बिनवडे अनुमोदक : श्री.रेणुकादास वैद्य, श्री.विनायक पांडे

मा.महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, यावर्षी देखिल औरंगाबाद महापालिकेतर्फे महापौर चषक ज्युदो स्पर्धा घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मनपा कार्यालय ते रोशनगेट पर्यंत जाणाऱ्या रस्त्यास कै.अब्दुल अजीम नांव देणे. कारण कै.अब्दुल अजीम हे आपल्या सभागृहाचे सदस्य होते तसेच माजी मंत्री,खासदार होवून आपल्या शहराचा नावलौकीक केलेला आहे. त्यांनी शहरात मोठमोठे शिक्षण संस्था उभारण्यास त्यांचा सिंहाचा वाटा आहे.म्हणून ते शिक्षण सम्राट म्हणून पण प्रसिध्द होते. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.जावेद कुरैशी अनुमोदक : १.श्री.हाजी शेरखान, २.श्री.जावेद हसन खान

श्री.अ.रशिद खान : या प्रस्तावाचे सुचक व अनुमोदक उपस्थित नाहीत.

मा.महापौर : प्रस्ताव रद्द करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यास मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. ८५/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझ्या प्रभागातील सिंधी कॉलनी येथील मोंढा नाका चौकाला श्री.अमर शहीद संत कंवरराम चौक असे नांव देण्यांत यावे. श्री.अमर शहीद संत कंवरराम हे सिंधी समाजाचे आदरणीय स्थान आहे आणि त्या भागात सिंधी समाज हा मोठ्या प्रमाणात राहतात, करीता सदरी ठराव येणाऱ्या सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी ठेवण्यात यावा.

सुचक : श्री.मधुकर सावंत अनुमोदक : श्री.संजु रिडलॉन, श्री.संतोष खेंडके, श्री.सतीष कटकटे

श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ : नाव देण्या बाबतचे प्रस्ताव कमेटी नियुक्त करून कमेटीकडे पाठविण्यात यावे.

मा.महापौर : यापूढे नाव देण्या बाबत जे प्रस्ताव येतील ते कमेटीकडे पाठविण्यात येईल एक कमेटी नियुक्त करण्यात येईल. प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,सिंधी कॉलनी येथील मोंढा नाका चौकाला श्री.अमर शहीद संत कंवरराम चौक असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते तसेच यापुढे नाव देण्याबाबत जे प्रस्ताव येतील त्यासाठी एक कमेटी नियुक्त करण्यात येईल व सदरील प्रस्ताव कमेटीकडे पाठविण्यात येईल, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८६/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, डॉ.आंबेडकरनगर,सिडको एन-७ भागात दिनांक १८.०८.२००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे या भागातील कु.ऋतिक सुनिल घुसळे (वय-६) या बालकाचा घराची भिंत पडून दुर्दैवी मृत्यु झाला आहे. याबाबत मा.महापौर,मा.उपमहापौर,मा.सभागृह नेता तसेच मा.विरोधी पक्षनेता यांनी या भागात भेट दिलेली आहे.

सदर बालकाचे वडील हे मोलमजुरी करून उदरनिर्वाह करीत आहेत, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या हानीमुळे त्यांचा भविष्यातील सहारा गमावलेला आहे. तरी त्यांना सहानुभूतीच्यादृष्टीने महानगरपालिकेकडून र.रू.११,०००/- (अकरा हजार फक्त) आर्थिक मदत देण्यात यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.कचरूजी श्रीपतराव सोनवणे,श्री.नारायण तिलोकचंद कुचे

अनुमोदक : श्री.दिलीप नारायण गायकवाड, श्री.संजु सुग्रीव रिडलॉन

मा.महापौर :प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.आंबेडकरनगर,सिडको एन-७ भागात दिनांक १८.०८.२००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे घराची भिंत पडून दुर्दैवी मृत्यु झालेल्या कु.ऋतिक सुनिल घुसळे (वय-६) या बालकाच्या वडीलास सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेकडून र.रू.११,०००/- (अकरा हजार फक्त) आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८७/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.५ मधून आमखास मैदान ते खाम नदी व त्यापुढे जाण्यासाठी मनपाच्या विकास आराखड्यात ६० फुट रूंद रस्त्याचा प्रस्ताव आहे. सदरील रस्ता गेल्या १५ वर्षापासून फक्त डी.पी.प्लॅन मध्येच रस्ता म्हणून आहे. जागेवर आता पर्यंत रस्त्यासाठी जागा भुसंपादन करण्यात आलेली नाही.

म्हणून सदर रस्ता मनपा विकास योजने अनुसार विकसीत करणेसाठी अर्थसंकल्प २००५-२००६ मध्ये पेज नं.२४ मध्ये भूसंपादनसाठी रक्कम रूपये १०.०० कोटीची तरतुद अनुसार सदर रस्ता ६० फुट त्वरीत विकासीत करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.नासेर मोहम्मद नाहदी अनुमोदक : श्री.रशिद खान मामु

श्री.संतोष खेंडके : हा प्रस्ताव प्रशासनाच्या वतीने शहर सुधार समिती मार्फत घेण्यात यावा.

मा.महापौर : सदर प्रस्ताव प्रशासनाच्या वतीने ठेवण्यात यावा. या सभागृहासमोर सादर करावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव प्रशासनाच्या वतीने शहर सुधार समितीमार्फत ठेवण्यास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८/१७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी व कायमस्वरूपी 'महापौर चषक' स्पर्धामध्ये अपंग व्यक्तींच्या मैदानी क्रिडा स्पर्धांचा अंतर्भाव करावा, व सदर विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.के.व्ही.मोरे अनुमोदक : श्री.हिम्मतराव दाभाडे

श्री.तुपे त्रिबंक : महापौर चषक स्पर्धेमध्ये पंजा लढाव स्पर्धा देखील समाविष्ट करण्यांत यावी, अशी दुरूस्ती करावी.

मा.महापौर : दुरूस्तीसह मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, याहीवर्षी व कायमस्वरूपी महापौर चषक स्पर्धामध्ये अपंग व्यक्तींच्या मैदानी क्रिडा स्पर्धांचा अंतर्भाव करण्यास आणि पंजा लढाव महापौर चषक क्रिडा स्पर्धा घेण्याच्या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर : ऐनवेळचे दोन प्रशासकीय प्रस्ताव आहे. ते व इतर पालिका सदस्यांचे सर्व प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. ८९/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक १८.१०.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.८१ अन्वये महानगरपालिकेतर्फे औरंगाबाद शहरात शहर बस वाहतूक उपक्रम राबविण्यासाठी अभिकर्ता नेमण्यासाठी प्राप्त झालेली मे अकोला प्रवासी व माल वाहतूक संस्था मर्यादित, अकोला यांची निविदा स्विकारणेस प्रस्तावातील अटी व शर्तीस अधीन राहून ''इंधन खर्चामध्ये वाढ झाल्यास तिकिटाचे दर वाढविण्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद याऐवजी तिकिटाचे दर वाढविण्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार आर.टी.ए.ला असेल व आर.टी.ए. जी दरवाढ मंजूर करतील त्याच प्रमाणात रॉयल्टीचे दर ००.८० प्रति कि.मी.मध्ये वाढ होतील'' आणि अटी शर्तीतील अ.क्र.२ मध्ये वाहनाचा रंग व डिझाईन मा.पदाधिकारी व आयुक्त ठरवतील. या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात आलेली आहे व सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्यास शिफारस केली आहे.

मा.स्थायी समितीने सूचविल्याप्रमाणे मुळ प्रस्तावात दुरूस्ती करण्यात आलेली असून स्थायी समितीसमोर सादर करण्यात आलेला प्रशासनाचा प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सर्वसाधारण सभा विषय क्र. ४६/३ दि.१८.८.२००५ नूसार असे ठरले की, शहर बस वाहतूक एस.टी. महामंडळाकडून हस्तांतरीत न करता एस.टी. महामंडळाने आणखीन सहा महिने चालवावी.

मध्यंतरीच्या काळात आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद, यांनी खाजगी संस्थेकडून शहर बस वाहतूक चालविणे शक्य आहे काय? ते तपासून पहावे व शक्य असल्यास रॉयल्टी बेसीसवर चालविण्यासाठी पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी व वैधानिक कार्यवाही करण्यासाठी सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

त्यानूसार महानगरपालिकेतर्फ़े औरंगाबाद शहरात शहर बस वाहतूक उपक्रम राबविण्यासाठी अभिकर्ता नेमण्यासाठी राज्यस्तरीय वर्तमान पत्रात १) लोकसत्ता २) महाराष्ट्र टाईम्स् ३) टाईम्स् ऑफ़ इंडिया ४) दै. लोकमत ५) सकाळ या वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आल्या. खालीलप्रमाणे अटी व शर्ती ठरविण्यात आल्या होत्या.

**शहर बस वाहतूक संबंधी सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१) औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत ''**औरंगाबाद परिवहन उपक्रम** '' या नांवाने शहर बस वाहतूक चालवावी लागेल.

शहरातील २५ रूटवर अंदाजे १०० बसेस टाटा -७०९, महींद्रा ,आयशर , स्वराज माझदा इत्यादी चासीसवर आधुनिक पध्दतीने बॉडी बनवून नवीन बसेस शासनाच्या नियमानुसार खरेदी कराव्या लागतील. त्यापैकी ५ बसेस मध्ये ए.सी . बसवून टुरिस्ट रूटवर वापरण्यात येतील. चढण्या व उतरण्यासाठी दोन दरवाजे जे हायड्रोलीक सिस्टीमने ॲटोमॅटीक उघडणारे व बंद होणारे राहतील.

२) सर्व बसेस महानगरपालिकेच्या नांवावर खरेदी कराव्या लागतील. बस बॉडीचे डिझाईन बॉडी बिल्डर्स कडून मागवून त्यातील सर्वोत्कृष्ट डिझाईनची निवड मा. आयुक्त करतील. बसचा रंग मा. आयुक्तांच्या निर्णयाप्रमाणे द्यावा लागेल. बस खरेदीसाठी लागणारे २० % मार्जीनमनी एजन्सी ज्यांच्या नांवे बी.ओ.टी. तत्वावर १० वर्षाच्या कालावधीसाठी कंत्राट मंजूर झाला त्यांना भरावा लागेल. ८० % रक्कमेसाठी बँकेमार्फ़त कर्ज घ्यावे लागेल.

३) या उपक्रमासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फ़े कोणत्याही प्रकारचा खर्च केला जाणार नाही. बससेवा , कर्मचाऱ्यांची नेमणूक त्यांचा पगार, भत्ते, ड्रेस इत्यादींचा खर्च एजन्सीस करावा लागेल. बससेवा कर्मचाऱ्यांचा महानगरपालिकेशी काहीही संबंध राहणार नाही. कारण ते संबंधित संस्था/फ़र्म/एजन्सी यांचे कर्मचारी असतील व त्यांना महानगरपालिकेच्या नोकरी बाबत हक्क मागता येणार नाही.तसे महानगरपालिका कार्यालयाशी नोकरीचा हक्क प्रस्थापित करता येणार नाही

४) संबंधित संस्था/फ़र्म/एजन्सी/कंपनी शासन परिवहन विभागाचा व इतर विभागाच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे लागेल. तसेच शासकिय फ़ीस/कर भरण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधिताचीच असेल.

५) परिवहन उपक्रम राबवितांना अपघातातुन उद्‌भवणारी नुकसान भरपाई देणे तसेच मदत देणे व वैद्यकिय मदत इत्यादी जबाबदारी महानगरपालिकेची राहणार नाही, ती संबंधित संस्थेची राहील.

६) बसेसवर होणारा दुरूस्ती खर्च, डिझेल/ऑईल इत्यादींचा खर्च संस्थेस करावा लागेल. त्यासाठी सुसज्ज कार्यशाळा त्यांना सुरू करावी लागेल. बसेसचा विमा काढणे अथवा विम्यांचे नुतनीकरण हा खर्च संबंधित संस्थेस करावा लागेल.

७) शासनाच्या नियमानुसार नागरिकांना/विद्यार्थ्यांना प्रवासासाठीच्या सवलती व पासेस द्यावे लागतील.

८) तिकीटाचे दर व थांबे प्रादेशिक परिवहन प्राधिकरण व मा. विभागीय आयुक्त (महसूल) यांनी ठरवून दिल्यानुसारच आकारावे लागतील. ए.सी. बसेससाठी २०% अधिक रक्कम चार्ज करता येईल.

९) बसेसच्या रूटसाठी आर.टी.ओ. कार्यालयाकडून व राज्य परिवहन महामंडळाकडून परवानगी घ्यावी लागेल.

१०) बसेस पार्कीग करण्यासाठी , कार्यशाळा , सर्व्हीस स्टेशन, कार्यालयीन इमारतीसाठी लागणारी जागा महानगरपालिका उपलब्ध करून देईल. या जागेचा पूर्ण विकास एजन्सीस करावा लागेल. त्यावर एजन्सीस किराया लागणार नाही. परंतु त्यावर कराव्या लागणाऱ्या बांधकामाचा खर्च एजन्सीस करावा लागेल.

११) कमीत कमी १० बसेस चालवणाऱ्या व बस वाहतूक चालविण्याचा ज्या संस्था/फर्म/एजन्सीज/कंपनीस अनुभव आहे अशांनाच औरंगाबाद परिवहन उपक्रम चालविण्यास देण्यात येईल.

१२) सर्व सिटी बसेस द्वारे जेवढे किलोमीटर रनिंग होईल त्या कि.मी. रनिंगवर प्रति किलोमीटर रॉयल्टी जी संस्था/फर्म /एजन्सी जास्तीत जास्त रॉयल्टी महानगरपालिकेस देईल, त्याचे देयक मंजूर करून त्यांच्याशी १० वर्षाचा सामंजस्य करार करण्यात येईल.

१३) बस सर्व्हीसद्वारे येणारे उत्पन्न बँकेत जॉईंट अकाऊंट (ESCROW) उघडून रोज जमा करावे लागेल. प्रति कि.मी. प्रमाणे होणारी रॉयल्टीची रक्कम महानगरपालिकेच्या खात्यात दर महिन्याला जमा केल्यानंतर व कर्जाचे हप्ते भरल्यानंतर उरलेली रक्कम एजन्सीस अदा करण्यात येईल.

१४) ठरविलेल्या रूट व्यतिरिक्त नवीन बस रूट सुरू करावयाचे ठरल्यास त्यासाठी लागणारी परवानगी घेऊन एजन्सीस त्या रूटवर बस चालविणे बंधनकारक राहील.

१५) रूपये ५० लक्ष वार्षिक उलाढाल असल्याबाबत कागदपत्रे सादर करावी लागतील.

१६) इन्कम टॅक्स व सर्व्हिस टॅक्स क्लीयरन्स् सर्टीफ़िकेट सादर करणे बंधनकारक राहील.

१७) शहरातील बस थांब्यावर महानगरपालिकेने निर्देशित केल्याप्रमाणे डिझाईनचे निवारे बांधण्याचे काम संस्थेस करावे लागेल व तेथे लागून महानगरपालिकेने ठरविलेल्या आकाराची छोटी दुकाने बांधण्यास महानगरपालिका परवानगी देईल. जे चालविण्यासाठी मा. आयुक्त ठरवतील अशा अपंग व्यक्तींना प्रधान्याने देण्यात येतील. त्याद्वारे येणारा किराया संस्थेस मिळेल. बस थांब्यावरील जाहीरातीचे उत्पन्न संस्थेस मिळेल. या जाहीरातीचे फ़क्त महानगरपालिकेचे जाहिरात कर एजन्सीला भरावे लागतील. स्वच्छता व देखरेख करण्याची जबाबदारी संस्थेची राहील व छोटया दुकानांमध्ये टी स्टॉल, एस.टी.डी.-पी.सी.ओ., बुकस्टॉल इत्यादी महानगरपालिका ठरवेल अशा व्यवसायासाठी देण्यात येईल. बॉडीवर दिल्या जाणाऱ्या जाहिरातींचे उत्पन्न संस्थेस मिळेल. परंतू प्रत्येक बसची एक साईड केवळ महानगरपालिकेसाठी रिझर्व्ह राहील. प्रत्येक बस स्थानकाच्या जागी एक महानगरपालिकेची ठरविलेली डिझाईन प्रमाणे बिलबोर्ड ठेवण्यास परवानगी देण्यात येईल त्याचा Joy क्षेत्र बसेसची माहिति काढणे आणि पूर्ण जाहिरातीसाठी उपलब्ध राहील.

१८) प्रत्येक बसची दरवर्षी घसारा किंमत महानगरपालिकेने ठरविलेल्या व्हॅल्युअर कडून काढून जर एकूण किंमत बँकेच्या उरलेल्या लोन रक्कमेपेक्षा कमी असतील तर फ़रका एवढे फ़िक्स डिपॉझिट संस्थेस बँकेत जमा करावे लागेल. ही रक्कम मा. आयुक्तांच्या परवानगीशिवाय काढता येणार नाही. व्हॅल्युअरची फ़ीस संस्थेस अदा करावी लागेल.

१९) ज्यांचे नांवे निविदा मंजूर होईल त्यांनी निविदा मंजूरीपासुन तीन महिन्याच्या आत बसेस खरेदी करून त्या प्रत्यक्षात सुरू कराव्या लागतील.

शहर बस वाहतूकीसाठी दरपत्रक सुचना जा.क्र.मनपा/अशअ/यांत्रिकी/२१७/२००५ दि.९.९.२००५ प्रमाणे जाहीर करण्यात आली. कोऱ्या निविदा विक्रीचा कालावधी दि.१२.९.०५ ते ३०.९.०५ हा होता व या काळात एकूण तीन निविदापत्रके विक्री झाली.

**१) मे. दिपक ट्रान्स्पोर्ट , पुणे.**

**२) मे. तरवडे ट्रान्स्पोर्ट, प्रा. लि. औरंगाबाद.**

**३) मे. अकोला प्रवासी व माल वाहतूक सहकारी संस्था मर्यादित. अकोला.**

दरपत्रक भरलेल्या निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत दि.३.१०.२००५ पर्यंत फक्त एकच निविदा दर भरून प्राप्त झाली. त्यांनी भरलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| Particulars | Royalty |
|---|---|
| एकूण मासिक होणाऱ्या शहर बस वाहतूकीच्या प्रवास कि.मी. वर प्रति कि.मी. रॉयल्टी किती देणार , ही रक्कम बाजूच्या रकान्यात अंकात व अक्षरात नमूद करावी. | प्रति कि.मी. रनींगसाठी<br>अंकात **०.८०** रूपये.<br>अक्षरी - **ऐंशी पैसे** प्रति कि.मी. |

सदरील एजन्सी याप्रकारची शहर बस वाहतूक अकोला महानगरपालिकेत दि.४.८.२००३ पासून चालवत आहे. तसेच नुकतेच त्यांनी नांदेड-वाघाळा महानगरपालिकेतील निविदा भरली असून हे काम पण त्यांना मिळाले आहे. त्याची कार्यवाही चालू आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेसाठी त्यांनी एकूण १५० टाटा ७०९ चॅसीस च्या ३० सिटर + १२ उभे प्रवासी करणाऱ्या बसेस प्रस्तावित केल्या आहेत.

सदरील संस्थेचे रजिस्ट्रेशन क्र.३११ असून सहकारी तत्वावर ती सेवा देणार आहेत. एकूण २५ मार्गावर सकाळी ६.०० ते दुपारी २.०० ते रात्री १०.०० पर्यंत दोन पाळयांमध्ये बससेवा देणार आहेत व १० कि.मी. अंतरापर्यंत किमान भाडे प्रौढ प्रवाशांसाठी ७ रूपये व बालकांसाठी ४ रू. राहील असे म्हटले आहे.

मा. आयुक्तांनी दि.७.१०.०५ रोजी सदरील निविदेवर चर्चा करण्यासाठी व वाटाघाटीसाठी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना बोलाविले असता त्यांचे एकूण पाच पदाधिकारी उपस्थित होते. मा. आयुक्त यांच्या दालनात झालेल्या बैठकीत शहर अभियंता, अतिरिक्त शहर अभियंता, मुख्य लेखाधिकारी व उपअभियंता यांची उपस्थिती होती. त्यामध्ये रॉयल्टी कर रू.००.८० प्रति कि.मी. खालील अटीवर मंजूर करण्यात आला.

१) सदरील संस्थेने सर्व वाहनांचा विमा वाहनांसाठी/प्रवाशांसाठी/अपघातासाठी/फुल्ली कॉम्प्रेनसिव्ह विथ थर्ड पार्टी/भुकंप/पूर इत्यादी सह उतरवावा. त्याची पूर्ण रक्कम संस्थेस अदा करावी लागेल.

२) इंधन खर्चामध्ये वाढ झाल्यास तिकिटाचे दर वाढविण्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना राहील व आर.टी. ए. जी दरवाढ मंजूर करतील त्याच प्रमाणात रॉयल्टीचे दर ००.८० प्रति कि.मी. मध्ये वाढ होतील.

वरील सर्व अटी व शर्ती **मे. अकोला प्रवासी व माल वाहतूक सहकारी संस्था मर्यादित. अकोला** यांनी मान्य केले आहे. टाटा ७०९ तसेच इतर कंपन्यांचे बॉडी बस डिझाईन/फोटोग्राफ़्स् आणून दाखविण्यास संस्थेस सुचना दिली. महानगरपालिकेतर्फे बसची डिझाईन अंतिम करण्यात येईल असे ठरले. बसला हायड्रोलीक डोअर्स बसविण्याबाबत डिझाईन अंतिम करतांना निर्णय घेण्यात येईल असे ठरले.

महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या जागेवर स्वखर्चाने उपक्रमासाठी लागणारी इमारत, कार्यशाळा, बसथांबे व इतर सोयी संस्थेने स्वखर्चाने करण्याचे मान्य केले.

मा. स्थायी समितीच्या मंजूरीनंतर पुढील कार्यवाही करारनामा करून सुरू करण्याचे ठरले. सदरील करारनामा हा (५+५) वर्षासाठी करावा लागेल. पहिल्या पाच वर्षानंतर कराराचे नुतनीकरण करून घ्यावे लागेल. सदरील संस्थेने शहर बस सेवा प्रथम ७५ बसेस व नंतर ७५ बसेस असे दोन टप्प्यात सुरू करण्याचे मान्य केले. तसेच एस.टी. डिपार्टमेंटशी संपर्क साधून प्रस्तावित केलेले १८ मार्ग + ७ नवीन मार्ग ठरवून बस थांबे किती राहतील याची माहिती घेवून व प्रत्येक रूटवर अंदाजे किती कि.मी. रनिंग होईल याची माहिती संस्थेने सर्व्हे करून सादर करण्याचे संस्थेने मान्य केले.

तरी प्रस्तावित अटी व शर्ती व मूळ निविदेतील अटी विचारात घेऊन औरंगाबाद शहर बस वाहतूक सेवा **मे.अकोला प्रवासी व माल वाहतूक सहकारी संस्था मर्यादित,अकोला** यांना रॉयल्टी बेसीसवर चालविण्यास देण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतर्फे औरंगाबाद शहरात शहर बस वाहतूक उपक्रम राबविण्यासाठी प्रस्तावातील अटी व शर्ती तसेच मूळ निविदेतील अटी यास अधीन राहून औरंगाबाद शहर बस वाहतूक सेवा मे. अकोला प्रवासी व माल वाहतूक सहकारी संस्था मर्यादित, अकोला यांना रॉयल्टी बेसीसवर चालविण्यास देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९०/२ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या गरवारे क्रिडा संकुल येथील ६ एकर मोकळ्या जागेवर दिल्ली टुरीझम अँड ट्रान्सपोर्टेशन डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड, दिल्ली यांच्यातर्फे दिल्ली येथे भरण्यात येत असलेल्या कायम स्वरूपी दिल्ली हाटच्या धर्तीवर BOT तत्वावर एकाच छत्राखाली विविध स्टॉलची उभारणी करून स्टॉल भाडेतत्वावर दिल्यास

महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ अपेक्षित आहे. साधारणत: खालील प्रकारचे स्टॉल उभारणे उचीत राहील.

०१. औरंगाबाद परिसरातील प्रसिध्द ''हिमरू शॉल'' विक्री केंद्र
०२. पैठणी विक्री केंद्र
०३. महाराष्ट्रातील विविध भोजन थाळी स्टॉल
०४. सोव्हीनेर, पुस्तकांचा स्टॉल
०५. हस्तकला प्रदर्शन व विक्री स्टॉल
०६. ऐतिहासिक नगरीच्या दृष्टीने पर्यटन माहिती स्टॉल

अशा व इतरही विविध स्टॉलची उभारणी होवू शकते. शहरातील व शहराबाहेरील नागरीकांना एकाच छत्राखाली सर्व सोयी उपलब्ध करून देण्यात येतील.

त्यामूळे औरंगाबाद शहरात येणाऱ्या पर्यटकांसाठी मराठवाड्यात एक चांगले दालन उपलब्ध होईल. तसेच महाराष्ट्रातील विविध भागातील भोजनांचा स्वाद एका छत्राखाली घेता येईल. पर्यटनाचे व सांस्कृतिक दृष्टीने याची भर औरंगाबादेत निर्माण होईल. करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या गरवारे क्रिडा संकुल येथील ६ एकर मोकळ्या जागेवर दिल्ली टुरीझम अँड ट्रान्सपोर्टेशन डेव्हलपमेंट कार्पोरेशन लिमिटेड, दिल्ली यांच्यातर्फे दिल्ली येथे भरण्यात येत असलेल्या कायम स्वरूपी दिल्ली हाटच्या धर्तीवर BOT तत्वावर एकाच छत्राखाली विविध स्टॉलची उभारणी करून स्टॉल भाडेतत्वावर देण्यास आणि खालील प्रकारचे स्टॉल उभारणेस यात स्टॉलमध्ये वाढ करावयाची झाल्यास सभागृहाच्या मंजूरीने वाढ करता येईल. सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

०१. औरंगाबाद परिसरातील प्रसिध्द ''हिमरू शॉल'' विक्री केंद्र
०२. पैठणी विक्री केंद्र
०३. महाराष्ट्रातील विविध भोजन थाळी स्टॉल
०४. सोव्हीनेर, पुस्तकांचा स्टॉल
०५. हस्तकला प्रदर्शन व विक्री स्टॉल
०६. ऐतिहासिक नगरीच्या दृष्टीने पर्यटन माहिती स्टॉल

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दरवर्षी दर्गा निजामोद्दीन रोड, शहागंज येथे मीना बाजार भरविण्यात येतो. हा बाजार सार्वजनिक स्वरूपाचा असून राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक आहे. महानगरपालिका अशा कार्यक्रमांना नेहमीच सुविधा उपलब्ण करून देत असते. या मीनाबाजाराचा सर्व जनतेला फायदा व्हावा या दृष्टीने यावर्षी मीनाबाजार निविदेवर न देता ना नफा ना तोटा या तत्वावर भरविण्यात यावा, व मीनाबाजारासाठी प्रत्यक्षात येणाऱ्या खर्चाचीच समितीने आकारणी करावी. समितीचे गठन करण्याचे अधिकार मा.महापौर यांना प्रदान करण्यास आणि या समितीस मीनाबाजाराच्या सर्व कामकाजावर देखरेख व नियंत्रण करण्यास मान्यता मिळावी तसेच महानगरपालिकेचा जाहिरातीवर झालेला व होणारा खर्च अंदाजे रक्कम रूपये २५,०००/- महानगरपालिकेस अदा करण्यास आणि संयोजन समितीने महानगरपालिकेच्या अटी व शर्तीनुसार करारनामा करून देणे व अटी व शर्तीचे उल्लंघन होणार नाही यासाठी सुरक्षा रक्कम रूपये १,००,०००/- चा धनादेश महानगरपालिकेकडे जमा करण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सूचक : ०१. श्री.अब्दुल रशीदखान मामू, ०२. श्री.नासेर मोहमंद नाहदी
अनुमोदक : ०१. श्री.सय्यद खसरो बुऱ्हानोद्दीन, ०२.श्री.दाभाडे मिलींद यशवंत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहागंज - दर्गा निजामोद्दीन येथे शहरातील जनतेचे सार्वजनिक हित लक्षात घेन मीनाबाजार हा विना निविदा व ना नफा ना तोटा या तत्वावर भरविण्यास आणि यासाठी येणारा प्रत्यक्ष खर्चच फक्त संयोजकाने व्यापाऱ्याकडून वसूल करण्यास आणि यावर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी खालील प्रमाणे पालिका सदस्यांची समिती गठण करण्यास मंजूरी देण्यात येते.

०१. श्री.अब्दुल रशिदखान मामू
०२. श्री.सय्यद खुसरो
०३. श्री.मिलींद दाभाडे
०४. श्री.मुजीब आलमशाह खान
०५. श्री.नासेर मोहमंद नाहदी
०६. श्री.संजय जगताप
०७. श्री.कैसरखान बद्रोद्दीन खान

आणि महानगरपालिका प्रशासनातर्फे मालमत्ता अधिकारी व प्रशासकीय अधिकारी असतील.

तसेच बाजार संयोजन समितीने जाहिरातीसाठी, जाहिरातीचा खर्च रूपये २५,०००/- महानगरपालिकेस अदा करावा आणि महानगरपालिकेच्या अटी व शर्तीनुसार करारनामा करून देणेस आणि सुरक्षा रक्कम म्हणून संयोजकाने रक्कम रूपये १,००,०००/- धनादेश महानगरपालिकेकडे जमा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९२/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.३८ मधील अंगुरीबाग या ठिकाणी रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे करीता र.रू.२.५२ लक्षची तरतूद ठेवण्यात आलेली आहे. परंतू सदर ठेवण्यात आलेल्या तरतूदीतून करण्यात येणारे पुनर्डांबरीकरण अंगुरीबाग येथील न करता बंजारा कॉलनी,बहादुरपूरा या भागात करण्यात यावे. करीता प्रसव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री.संजु रिडलॉन अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३८ मधील अंगुरीबाग या ठिकाणी रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे करीता र.रू.२.५२ लक्षची ठेवण्यात आलेली तरतूद बंजारा कॉलनी, बहादुरपूरा या भागात पुनर्डांबरीकरण करण्याकरीता वापरण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९३/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००५-०६ चे अर्थसंकल्पी मूळ अंदाजपत्रकातील पान क्रमांक १२९ अनुक्रमांक ११ वर उल्लेखित ''पीरगैब कब्रस्तान अंतर्गत पाथवे तयार करणे'' असे कामाचे स्वरूप आहे. या कामा ऐवजी गणेश कॉलनी येथील मनपा शाळेच्या विकास कामानिमित्ताने वर्ग बदलणे आवश्यक आहे. करिता मा.साहेबांनी विषयसंबंधी नुसार वर्ग बदलणे ही विनंती.

सूचक : श्री.जावेद कुरैशी अनुमोदक : ०१.श्रीमती अलका पाटील, ०२.श्री.अशरफ मोतीवाला

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००५-०६ चे अर्थसंकल्पी मूळ अंदाजपत्रकातील पान क्र.१२९ अ.क्र.११ वरील लेखाशिर्ष बदलून त्याऐवजी गणेश कॉलनी येथील महापालिका शाळेच्या विकास कामास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९४/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद मनपाच्या २००५-०६ च्या अर्थसंकल्पात पृष्ट क्र.१५० वर अ.क्र.७९ मध्ये चंपा मस्जीद ते रोशनगेट रस्त्याचे डांबरीकरणासाठी तरतूद करण्यात आली आहे. रस्ते विकास महामंडळामार्फत जळगाव रोड ते चेलीपूरा पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण काम विशेष निधीतून होणार असल्याने अर्थसंकल्पातील सदरील तरतूद रू.३ (तीन) लक्ष मधून रोशनगेट ते मकसुद कॉलनी पर्यंतच्या मोठ्या गटारीवर लोखंडी जाळ्या बसविण्यासाठी व दूरूस्तीसाठी एक लक्ष रू.ची तरतूद

करावी तसेच उर्वरीत २ लक्ष रू.मधून मकसुद कॉलनी रोशनगेट प्रभागातील विविध ठिकाणची कमी व्यासाची ड्रेनेजलाईन काढून मोठ्या व्यासाची SWG ड्रेनेज लाईन टाकण्यात यावी.

तसेच अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र.१५२ वरील अ.क्र.१४ वर असलेले ''रोशनगेट येथील वाहतूक बेटाची दुरूस्ती'' हेरीटेज कमेटीतर्फे शासकीय अनुदानातून होणार असल्याने त्याकरीता ठेवलेल्या १ लक्ष रू.च्या तरतूदीची रक्कम मकसुद कॉलनी रोशनगेट प्रभागात टयुबलर पोल्स लावण्यासाठी वळती करण्यात यावी, करिता सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर.

सूचक : श्री.खान मुजीब मीर आलम खान अनुमोदक : श्री.रशिद खान मामु

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पातील पृष्ट क्र.१५० वर अ.क्र.७९ वरील तरतूदीचे लेखा शिर्ष बदलून त्याऐवजी रोशनगेट ते मकसुद कॉलनी पर्यंतच्या मोठ्या गटारीवर लोखंडी जाळ्या बसविण्यासाठी व दूरूस्तीसाठी र.रू.१.०० लक्ष व मकसुद कॉलनी रोशनगेट प्रभागातील विविध ठिकाणची कमी व्यासाची ड्रेनेजलाईन काढून मोठ्या व्यासाची SWG ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी र.रू.२.०० लक्ष तसेच पृष्ठ क्र.१५२ अ.क्र.१४ वर असलेली तरतूद र.रू.१.०० लक्ष मकसुद कॉलनी रोशनगेट प्रभागात टयुबलर पोल्स लावण्यासाठी वळती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९५/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प २००५-०६ मध्ये पान क्रमांक १२६ अ.क्र.६ वर स्लम भागात ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी ४.०० लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे.

परंतू या ड्रेनेज लाईन टाकण्याचा कामा ऐवजी वार्ड क्र.८ मध्ये विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट, पाणी पुरवठा लाईन टाकण्या कामा करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सूचक : श्री.तरविंदरसिंग धिल्लन अनुमोदक : श्री.हाजी शेरखान, श्री.निसार खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००५-०६ मध्ये पान क्र.१२६ अ.क्र.६ वरील तरतूदीचे लेखाशिर्ष बदलून त्याऐवजी वार्ड क्र.८ मध्ये विविध ठिकाणी स्ट्रीट लाईट, पाणी पुरवठा लाईन टाकण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९६/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अर्थसंकल्प २००५-२००६ मधील पृष्ट क्रमांक १६४ अ.क्र.३४ वर एन-९ एच सेक्टरचा पाणी पुरवठा सुधारण्यासाठी १५० मी.मी. व ३०० मी.मी. व्यासाची डि.आय.के.९ जलवाहिनी टाकणे या शिर्षकाखाली २.५० (दोन लाख पन्नास हजार) ची तरतूद करण्यात आली आहे. त्याऐवजी वॉर्ड क्रमांक १७ श्रीकृष्णनगर मध्ये विविध ठिकाणी जलवाहीनी टाकणे अशी दुरूस्ती करणे बाबत लेखा शिर्ष बदलण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे.

सूच : श्री.महेश माळवतकर अनुमोदक : श्री.संजय जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००५-२००६ मधील पृष्ट क्रमांक १६४ अ.क्र.३४ वरील तरतूदीचे लेखाशिर्ष बदलून त्याऐवजी वॉर्ड क्रमांक १७ श्रीकृष्णनगर मध्ये विविध ठिकाणी जलवाहीनी टाकण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर ''राष्टगिताने ''सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले आहे.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद.